पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. ०४ जून २०२६ | वर्ष : १४ | अंक : ०४१ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com


आतील पानात...


३ चतुर्थी निमित्त हजारो भाविकांनी घेतले श्री विघ्नहराचे दर्शन

४ अनिल शेंगाळे यांची पोलीस हवालदारपदी पदोन्नती;

५ विशेशबंधुतेचा ध्यास घेतलेल्या रोकडे यांचे जीवन दिशादर्शक





पान ८ वर..


## कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणासाठी महापालिका आक्रमक जमीन न दिल्यास सक्तीचे भूसंपादन; अतिक्रमणांवरही कारवाई

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक कोंडीचा होत असलेला गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. कोंडी सोडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या कात्रज–कोंढवा रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी पुणे महापालिकेने आता आक्रमक भूमिका घेतली आहे.

या रस्त्यासाठी आवश्यक जमीन देण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकांविरुद्ध सक्तीच्या भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच रस्ता तयार करण्यासाठी महापालिकेच्या ताब्यात आलेल्या जागांवरील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांवरही लवकरच कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

कात्रज ते कोंढवा हा शहरातील सर्वाधिक वर्दळीचा मार्ग मानला जातो. वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणाऱ्या गृहसंकुले आणि व्यावसायिक आस्थापनांमुळे या मार्गावर दिवसाच्या बहुतांश वेळेत वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी होत असली तरी जमीन संपादन



आणि अतिक्रमणांच्या गुंत्यात हा प्रकल्प रखडला होता.

महापालिकेने आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर आवश्यक जागा ताब्यात घेतली असली तरी काही मालमत्ताधारकांकडून अद्याप जागा हस्तांतरित करण्यात आलेली नाही. प्रशासनाने यापूर्वी संबंधितांना वारंवार नोटिसा देऊन आणि चर्चेद्वारे जागा स्वेच्छेने देण्याचे आवाहन केले होते. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने आता कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेच्या ताब्यात आलेल्या जागांवरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम लवकरच सुरू होणार आहे. तसेच जागा न देणाऱ्या मालकांविरोधात कायद्यानुसार सक्तीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील प्रमुख अडथळे दूर होऊन प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रस्तारुंदीकरण पूर्ण झाल्यानंतर कात्रज, कोंढवा, खडी मशिन चौक तसेच परिसरातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल अपेक्षित आहे. दररोज वाहतूक कोंडीचा सामना करणाऱ्या हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असून, प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुकर होणार आहे, असे महापालिकेतील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या रस्त्याचे भूसंपादन करून हा रस्ता वाहतुकीसाठी सुरू व्हावा, यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम विशेष आग्रही आहेत. जे नागरिक टीडीआर तसेच एफएसआय देऊनही जागा ताब्यात देण्यास तयार नसतात त्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी रोख रक्कम देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे.

## संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे ७ जुलैला प्रस्थान

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : आषाढी पायी वारीसाठी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी देहू येथून सात जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. हा पायी पालखी सोहळा १८ दिवसांचा प्रवास करून २४ जुलै रोजी पंढरीत दाखल होईल. यंदा पालखी सोहळ्याचे ३४१ वे वर्ष आहे. श्री संत तुकाराम महाराज संस्थानाने याबाबत माहिती दिली.

पालखीचे प्रस्थान सात जुलै रोजी होणार असून, पहिला मुक्काम येथील इनामदार वाड्यात होईल. पालखी इनामदार वाड्यातून आठ जुलै रोजी बाहेर पडल्यानंतर पहिल्या अभंग आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गाजवळ थांबेल, तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी पालखी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल आणि संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात विसावेल.

कोठे होणार पालखीचा मुक्काम?

९ व १० जुलै : पुण्यात नाना पेठेत, ११ जुलै : लोणी काळभोर, १२ जुलै : यवत, १३ जुलै : वरवंड, १४ जुलै : उंडवडी गवळ्याची, १५ जुलै : बारामती येथील शारदा प्रांगणात, १६ जुलै : (काटेवाडी मेंढ्याचे रिंगण) सणसर पालखी तळावर



रात्री मुक्काम, १७ जुलै : (बेलवाडी गोल रिंगण पहिले) निमगाव केतकी, १८ जुलै : (इंदापूर दुसरे गोल रिंगण) इंदापूर पालखी तळ, १९ जुलै : सराटी, २० जुलै : निरा स्नान (अकलूज माने येथे तिसरे गोल रिंगण) आणि पालखी तळावर रात्रीचा मुक्काम, २१ जुलै : (माळीनगर पहिले उभे रिंगण) बोरगाव मुक्काम, २२ जुलै : पिराची कुरोली, २३ जुलै : (बाजीराव विहीर दुसरे उभे रिंगण) वाखरी पालखी तळावर रात्रीचा मुक्काम, २४ जुलै : (पादुका जवळ आरती व उभे रिंगण तिसरे) पंढरपूरली२५ जुलै : पंढरपूर येथे आषाढी एकादशी सोहळा

## संक्षिप्त

### पुण्यात प्रभारी सहाय्यक आयुक्तांचे निलंबन

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : जनगणनेच्या कामात निष्काळजीपणा आणि राष्ट्रीय कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी येरवडा–वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त राजेश गुर्रम यांना निलंबित करण्यात आले आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी हे आदेश दिले.

गुर्रम यांच्याकडे जनगणनेसाठी प्रगणक नोंदणी, नियुक्तीपत्रे, घरयादी गट तयार करणे आणि प्रशिक्षणाचे नियोजन अशी महत्वाची जबाबदारी होती. १६ मे पासून सुरू झालेले हे काम १४ जूनपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र, गुर्रम यांनी मनुष्यबळाचे आणि प्रक्रियेचे योग्य व्यवस्थापन न केल्याने कामकाज रखडल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

आयुक्त नवलकिशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी वारंवार सूचना देऊनही गुर्रम यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. येरवडा–वडगाव शेरी भागातील एक हजार ३९ प्रगणक गटांपैकी केवळ ५४० गटांत काम सुरू झाले असून, उर्वरित ४९९ गटांतील काम अद्याप प्रलंबित आहे.

या गंभीर बाबीची दखल घेत महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम ५६ (२) (फ) नुसार चौकशी पूर्ण होईपर्यंत गुर्रम यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात त्यांना महापालिका क्षेत्र सोडण्यास मनाई केली असून, त्यांच्याविरुद्धची खातेनिहाय चौकशी तातडीने पूर्ण करण्याचे आदेश उपायुक्तांना दिले आहेत.

### तेलंगणात एमडी ड्रग कारखाना केला उद्ध्वस्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : तेलंगणा राज्यात सुरु असलेला एमडी अंमली पदार्थ तयार करण्याचा कारखाना मिरा–भाईंदर, वसई–विरार पोलीसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा क्र.४ ने उद्ध्वस्त केला आहे. कारखान्यातून तीन किलो एमडीसह हजारो लिटर अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत सुमारे सहा कोटी आहे.

पोलीसांनी एप्रिल महिन्यात मिरा रोडमधील नयानगर येथे राहणाऱ्या फिरदोस अरबाज कुरेशी हीच्या घरातून एकुण १ किलो ३२४ ग्रॅम वजनाचा एकुण २,६६,१७,२८० रुपये किंमतीचा एमडी हा अंमली पदार्थ जप्त केला होता.

त्यात फिरदोससह तीचा पती अरबाज वकील कुरेशी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाच्या तपासात मिरारोड तसेच मुंबई येथील आग्रीपाडा, मालवणी, मनोरी परिसरातून एमडी तयार करण्यासाठी लागणारे रसायन व लॅबचे साहित्य असा एकुण १३.६५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन १५ आरोपींना अटक करण्यात आली होती.

## पोलिसांची गोदामावर मोठी कारवाई; महाळुंगे एमआयडीसी ८१ गॅस सिलिंडर जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पिंपरी : महाळुंगे एमआयडीसी परिसरात गुन्हे शाखेच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने खराबवाडी येथे एका गोदामावर छापा टाकून एक लाख ३०० रुपयांचे तब्बल ८१ गॅस सिलिंडरचा बेकायदा साठा जप्त केले. या प्रकरणी पोलिसांनी सचिन प्रकाश म्हस्करे (वय ३१, रा. खराबवाडी, ता. खेड, जि. पुणे) या मुख्य आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. तसेच त्याच्यासोबत असलेल्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा अवैध कारभार सुरू होता. कोणतीही सुरक्षा यंत्रणा किंवा तांत्रिक मानके न पाळता, केवळ स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घरगुती सिलिंडरमधून व्यावसायिक सिलिंडरमध्ये अवैधरित्या गॅस रिफिलिंग (पलटी) केली जात



होती. गॅस गळती झाल्यास येथे मोठा स्फोट होऊन शेकडो निष्पापांचे जीव गेले असते. त्यामुळे पोलिसांनी वेळीच टाकलेला हा छापा संभाव्य भीषण अनर्थ टाळणारा ठरला आहे. मालमत्ता गुन्हे विरोधी पथकातील पोलीस अंमलदार गणेश सावंत आणि विनोद वीर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग देवकाते, गोरक्षनाथ बालवडकर, महेश खांडे, नितीन लोखंडे, गणेश कोकणे, अमर कदम आणि विशाल गायकवाड यांच्या संयुक्त पथकाने ही धडक कारवाई केली.

## राज्यातील प्रत्येक क्रीडांगणांवर स्वच्छतागृहे, चेंजिंग रूम, प्रकाशयोजनांसह सीसीटीव्ही सुविधा अनिवार्य

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे निर्देश

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्यातील महिला खेळाडूंना सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण मिळावे यासाठी सर्व क्रीडांगणांवर मॉडेल स्वच्छतागृहे, स्वतंत्र चेंजिंग रूम, पुरेशी प्रकाशयोजना आणि सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

महिला खेळाडूंसाठी क्रीडांगणांवर स्वच्छतागृहांच्या



सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भातील आश्वासनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, राज्यातील महिला खेळाडू राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यांना सुरक्षित वातावरण, दर्जेदार प्रशिक्षण, आर्थिक पाठबळ आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नव्या क्रीडा धोरणाद्वारे शासनाने खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला असून ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. राज्यातील सर्व क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी आवश्यक मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून कृती आराखडा तयार करावा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीत महिला खेळाडूंसाठी उपलब्ध सुविधांची सद्यस्थिती, आवश्यक सुधारणा आणि भविष्यातील नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## तांदूळ निर्यातीत भारताचा दबदबा आंबेमोहोर, इंद्रायनीची मागणी वाढली

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे: सुगंधी तांदूळ अशी ख्याती असलेल्या आणि पुणेकरांच्या आवडीचा असलेल्या आंबेमोहोर आणि इंद्रायणी परदेशातही तितकाच लोकप्रिय असल्याचे तांदळाच्या मागणीवरून स्पष्ट झाले आहे.

बासमतीसह आंबेमोहोर, इंद्रायणी आदी बिगर बासमती असलेल्या तांदळाने निर्यातीमध्ये जागतिक बाजारपेठेत निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. भारत आज जगातील सर्वांत मोठा तांदूळ निर्यातदार देश असून, जगातील एकूण तांदूळ निर्यातीपैकी सुमारे ४० टक्के हिस्सा भारताचा आहे. २०२४–२५ मध्ये देशातून २० ते २२ दशलक्ष टन तांदूळ निर्यात करण्यात आला असून, त्यातून १२.४७ अब्ज डॉलरचे परकीय चलन मिळाले आहे.

केंद्र सरकारने काही निर्यात निर्बंध हटवल्यानंतर भारतीय तांदळाची स्पर्धात्मकता वाढली आणि जागतिक बाजारात भारताने पुन्हा मोठी झेप घेतली. २०२५ मध्ये भारताची तांदूळ निर्यात २१.५५ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचल्याचा अंदाज आहे.

## मराठी चित्रपट महामंडळ निवडणुकीत तिरंगी लढत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. विविध शहरांमध्ये सभा, सदस्यांशी संवाद आणि भेटीगाठींद्वारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे. महामंडळाची निवडणूक कोण जिंकणार? याबद्दल उत्सुकता वाढली आहे. आता महामंडळाच्या निवडणुकीत तिसऱ्या आघाडीची 'एन्ट्री' झाली आहे. त्यामुळे आता समर्थ पॅनेल, चित्रकर्मी पॅनेल आणि महामंडळ बचाव अपक्ष संघ यांच्यात तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

चित्रपट महामंडळ निवडणुकीच्या मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक असताना निवडणुकीने वेगळेच वळण घेतले आहे. चित्रपट महामंडळ बचाव अपक्ष संघ या तिसऱ्या आघाडीने आपले आठ उमेदवार मुंबई येथे जाहीर करीत निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. अमोल भावे (दिग्दर्शक विभाग), संतोष शिंदे (अभिनेता विभाग), अवधूत जोशी (दिग्दर्शक विभाग), मनोज मराठे (निर्मिती व्यवस्था विभाग), शरद लोणकर (प्रसिद्धी विभाग),

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ

महादेव शिरोळकर (निर्माता विभाग), मानसिंग कदम (निर्माता विभाग) आणि उल्हास नांद्रे (कला दिग्दर्शक विभाग) हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. आतापर्यंत समर्थ पॅनेल आणि चित्रकर्मी पॅनेल यांच्यात थेट लढत होणार असल्याचे बोलले जात होते.

मात्र, तिसऱ्या आघाडीने दोन्ही पॅनेलला आव्हान दिल्याने निवडणुकीतील चुरस चांगलीच वाढली आहे. निवडणुकीत समर्थ आणि चित्रकर्मी पॅनेलकडून विविध शहरांमध्ये सभा, सदस्यांशी संवाद आणि भेटीगाठींद्वारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

## बलात्काराच्या गुन्ह्याची धमकी; तरुणाच्या आत्महत्येप्रकरणी चौघांना अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : लिव्ह–इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या तरुणाला बलात्काराच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देत पैशांची मागणी करून मानसिक छळ केल्याप्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे. या त्रासाला कंटाळून तरुणाने आत्महत्या केल्याची घटना खराडी परिसरात घडली.

करण बाळासाहेब कांबळे (वय २८) असे मृत तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी प्रीती बोढर्डे, अनिकेत बोढर्डे, संस्कृती रणदिवे आणि ऋतिक रणदिवे यांना अटक करण्यात आली आहे. करणचा भाऊ कृष्णा कांबळे यांनी खराडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, प्रीती आणि करण हे खराडीतील थिटे वस्ती परिसरात एकत्र राहत होते. दरम्यान, आरोपींकडून करणकडे वारंवार पैशांची मागणी करण्यात येत होती. पैसे न दिल्यास बलात्काराच्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देऊन त्याचा मानसिक छळ करण्यात आल्याचा आरोप आहे.

या सततच्या त्रासामुळे करणने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी चौघांना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## मराठा आरक्षण संदर्भात कक्ष स्थापन करणार : मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

### न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : मराठा आरक्षणासंदर्भात कक्ष स्थापन करण्यात येणार असून आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना सहाय्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे; तसेच प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू केला असून कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे–पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे–पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद



जाधव – पाटील, आमदार प्रसाद लाड, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंह, पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली – उगले, सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील, सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख; तसेच गृह, महसूल सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त, लातूर, धाराशिव आदी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मंत्री विखे–पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची पुर्तता निर्धारित वेळेत करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरु करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वेळप्रसंगी कारवाई करण्यात येईल.

न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण; तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांनी दाखले वितरित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पुढील तीन महिन्यांमध्ये गृहभेटी, विशेष शिबिरे आयोजित करुन याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्यावर निश्चित करावी. या कामाचा आढावा दर आठवड्याला घेण्यात यावा, अशा सूचनाही मंत्री विखे–पाटील यांनी दिल्या. जात पडताळणी प्रमाणपत्र वितरित करण्याबाबत दर १५ दिवसांनी विभागीय आयुक्त आढावा घेतील, असे सूचित करुन मंत्री विखे–पाटील म्हणाले की, मराठा आरक्षण कक्ष स्थापन करणे, आंदोलना दरम्यान मृत्यूमुखी पडलेल्या आंदोलकांच्या वारसांना अर्थसहाय्य देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. जिल्हाधिकारी कार्यालयात कुणबी प्रमाणपत्र मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी हेल्पलाईन नंबर पुढील आठ दिवसांत कार्यान्वित करावा.

# अग्रलेख : शिंदेसेना, राष्ट्रवादीची अवस्था सांगता येईना, सोसवेना!

विधानसभेच्या २०२९ च्या निवडणुकांमध्ये आपल्याला कुबड्यांची गरज लागणार नाही, असे सूतोवाच भाजपचे नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजवतानाच केले होते. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपसोबत जागावाटपावरून शिंदेसेना व राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात झालेली खडाखडी, निकालानंतर भाजप हाच मोठा भाऊ म्हणून पुढे येणे व आता विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून होणाऱ्या निवडणुकीत १७ पैकी ११ जागांवर भाजपने केलेला कब्जा हे सारे शहा यांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने सुरू असलेल्या प्रवासाचे सूचक संकेत आहेत. मागील वेळी भाजप सात, शिवसेना पाच, राष्ट्रवादी काँग्रेस तीन, तर काँग्रेसचे दोन आमदार या मतदारसंघातून विधान परिषदेवर गेले होते.

त्यावेळी शिवसेना व राष्ट्रवादीला फुटीचे ग्रहण लागले नव्हते. यावेळी भाजपने शिवसेना, राष्ट्रवादीने गेल्यावेळी जिंकलेल्या छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर या जागा स्वतःकडे घेतल्या. याखेरीज गेल्या वेळी काँग्रेसने जिंकलेल्या सातारा-सांगली, नांदेड मतदारसंघात उमेदवार उभे केले. आता चित्र बदलले असून, भाजप नंबर एकचा पक्ष असला तरी दुसऱ्या क्रमांकावर अजित पवार राष्ट्रवादी पक्ष आहे. वास्तविक जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित आली होती. ती विधान परिषदेला एकत्रित न येता पुण्यात समोरासमोर ठाकली आहे, तर सांगली-साताऱ्यात शरद पवार राष्ट्रवादीतच खेळखंडोबा सुरू आहे, काँग्रेसही महाविकास आघाडीला तिलांजली देत नुसती अर्जापुरती मैदानात आहे. शिंदे सेनेचे तानाजी पाटील यांनीही बंडाचा झेंडा फडकाविला आहे.

साहजिकच यामुळे महायुतीत धुसफूस व परिणामी बंडखोरी झाली आहे. नाशिक, पुणे, नांदेड, परभणी-हिंगोली, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, जळगाव, नागपूर अशा जवळपास सर्वच मतदारसंघात महायुतीमधील तिन्ही पक्षांत किंवा ज्या पक्षाला उमेदवारी मिळाली आहे त्या पक्षातील अन्य इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकवले. पुण्यात कालपर्यंत भाजपच्या वर्तुळात असलेल्या संजय काकडे यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) गटात उडी मारून पुत्र विक्रम याला उमेदवारी मिळवल्याने माजी आ. सुनील टिंगरे यांनी अर्ज दाखल केला. काकडे यांना उमेदवारी दिल्याने अगोदरच अजित पवार यांच्या निधनामुळे दिशाहीन झालेल्या राष्ट्रवादीमध्ये यादवी पेटली आहे. नाशिकमध्ये शिंदेसेनेचे नरेंद्र दराडे यांना महायुतीची उमेदवारी दिलेली असताना गणेश गिते यांचे बंधू गोकुळ व राष्ट्रवादीचे गोरख बोडके यांनी अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे अनिकेत तटकरे यांना उमेदवारी मिळाल्याने नाराज शिंदेसेनेचे आ. महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली यांनी अपक्ष अर्ज दाखल केला.

गोगावले यांना पालकमंत्रीपद देऊन तटकरे यांच्या घरात ही आमदारकी द्यायची, अशी मांडवली झाल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्याअंतर्गत शिंदेसेनेनेच पुढाकार घेत जुईली दळवींचा अर्ज मागे घेतला. त्यातून अनिकेत तटकरे यांचा मार्ग मोकळा झाला आहे. इकडे छत्रपती संभाजीनगरात आ. अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव समीर सत्तार यांनी पक्षादेश झुगारून बंड केले होते. यासंदर्भात अब्दुल सत्तार यांनी थेट भाजपवर तोफ डागली खरी, पण आता ते माघारीच्या पवित्र्यात आहेत.

महाविकास आघाडीतही सारे काही आलबेल नाही. अगोदरच राजकीयदृष्ट्या विकलांग झालेल्या या आघाडीतील पक्षातही संघर्षाच्या ठिणग्या उडताना दिसत आहेत. महाविकास आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला आठ, उद्धव सेनेच्या वाट्याला चार, तर राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या पदरात तीन जागा पडल्या. दोन जागांवर अजून महाविकास आघाडीत मतभेद आहेत.

महाविकास आघाडीतही मतभेद, बंडखोरी याची लागण झालेली आहे. नांदेडमधून काँग्रेसचे रामदास पाटील हे अधिकृत उमेदवार असले तरी काँग्रेसच्या माजी आ. माधवराव जवळकर यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. परभणी-हिंगोलीत उद्धव सेनेचे डॉ. विवेक नावंदर यांच्या विरोधात काँग्रेसचे सुशील देशमुख यांनी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीतील बंडखोरांना थंड करणे हे महाविकास आघाडीतील नेत्यांपुढील आव्हान असेल. कारण सत्तेचे फेविकॉल नसल्याने महाविकास आघाडी विस्कटली आहे. सोलापुरात तर काँग्रेस उमेदवारांचा अर्ज सूचकाच्याच घूमजावने बाद ठरला आहे. परभणीत उद्धव सेनेने मुस्लिम महापौर केल्याने 'खान हवा की बाण', असा मुद्दा उपस्थित करून नाकाने हिंदुत्वाचे कांदे सोलणाऱ्या शिंदेसेनेने विधान परिषदेच्या निवडणुकीत सईद खान यांना उमेदवारी दिली आहे. एकूणच महाविकास आघाडीची अवस्था ठार काही चांगली राहिलेली नाही.

वास्तविक महायुतीतील खदखद आणि एकूणच भाजप वगळता सर्वच ठिकाणचे संख्याबळ अधिक महाविकास आघाडी यांनी डाव खेळला तर भाजपला नामोहरम करण्याची संधी आहे. परंतु महायुतीच्या एकसंधतेच्या नावावर भाजपकडून शिंदेसेना-राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे खच्चीकरण करण्याच्या दिशेने विधान परिषद निवडणुकीत आणखी एक पाऊल पडलेले दिसत आहे. परिणामी भाजपच्या या भूमिकेनंतरही शिंदेसेना, राष्ट्रवादीची गळचेपी होऊनही सांगता येईना अन् सोसवेना अशी अवस्था आहे.

## अंतरंग



### आता उपोषणाची वेळ येऊ नये

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथे शेतात एका बाजेवर बसून मे महिन्यांच्या रणरणत्या उन्हामधे सकाळपासून पुन्हा एकदा उपोषण सुरू केले आणि मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील लेखी आश्वासन दिल्यानंतर पंधरा तासांनी म्हणजे मध्यरात्रीनंतर दिडच्या सुमारास त्यांनी उपोषण मागे घेतले. मराठवाड्यात ५८ लाख कुणबी समाजाच्या नोंदी सापडल्या आहेत त्या सर्वांची यादी जाहीर करावी व त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे, या मागणीसाठी त्यांनी सरकारच्या विरोधात पुन्हा आंदोलनाचे हत्यार उपसले होते. मनोज जरांगे हे मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील प्रमुख चेहरा आहेत. समाजासाठी त्यांनी केलेले नववे उपोषण होते. खरे म्हणजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे सरकार नेहमीच जरांगे यांचा आदर- सन्मान करते. त्यांच्या मागण्यांचा सरकार नेहमीच सहानभुतीने विचार करीत असते. जरांगे यांच्या मागण्यांविषयी सरकार सकारात्मक आहे असे स्वत: मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीरपणे सांगितले आहे. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील व भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांनीही जरांगे यांना भेटून सरकारची भूमिका सविस्तरपणे मांडली व उपोषणापासून त्यांना परावृत्त करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. महायुती सरकारने चर्चा व संवादाचे दरवाजे जरांगे यांच्यासाठी सदैव खुले ठेवले आहेत. मग जरांगे यांनी आपल्या समाजाच्या मागण्या रेटून नेण्यासाठी वारंवार उपोषणाचा मार्ग का अवलंबावा ?जरांगे यांच्या मागण्या चुकीच्या आहेत किंवा अवास्तव आहेत, असे सरकारने म्हटलेले नाही. जरांगे यांचे आंदोलन मोडून काढण्याचाही सरकारने प्रयत्न केला नाही. जरांगे यांच्या उपोषणाने वातावरण तापले व त्याचा परिणाम म्हणून सरकारच्या विरोधात समाजातील लोक रस्त्यावर उतरले तर त्यांना आवरणार कोण? मनोज जरांगे यांच्या नेतृत्वावर मराठा समाजातील तरूणांचा विश्वास आहे.आपल्या समाजासाठी ते लढतात, अशी भावना आहे.मनोज जरांगे हे कोणत्याही अमिषाला बळी पडणारा नेता नाहीत, अशी मराठा समाजातील तरूण वर्गाची त्यांच्यावर श्रध्दा आहे. पण सरकारने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी होत असताना पुन्हा उपोषण कशासाठी?जरांगे कधीही मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री वा कोणत्याही मंत्र्यांना भेटू शकतात. त्यांच्या मागण्यांवर ते चर्चा करू शकतात. जरांगे यांच्या मागण्यांवर सरकार शंभर टक्के विचार करणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे. मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे अशा काही मागण्यांसाठी विखे-पाटील यांनी महिनाभरचा वेळ मागितला. उपोषण स्थगित करावे किंवा सावलीत बसावे असेही विखे-पाटील यांनी त्यांना आवाहन केले. मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार नाही, असा निश्चय जरांगे पाटील यांनी बोलून दाखवला होता पण त्यांनी सरकारने दिलेल्या लेखी आश्वासनावर विश्वास ठेऊन उपोषण स्थगित केले हे चांगले केले. जरांगे यांनी आंदोलन सुरू केले की राज्यातील ओबीसी समाज पुढे सरसावतो असे चित्र अनेकदा दिसले आहे. एका समाजाचे काढून दुसऱ्या समाजाला दिले असे आम्ही कधीही केलेले नाही. ओबीसी समाजाला घाबरण्याची आवश्यकता नाही. मराठा समाजाचे समाधान करण्यासाठी आम्ही सगळे निर्णय घेऊ. पण ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. राज्यात मराठा विरूध्द ओबीसी असा तणाव निर्माण होऊ नये, ही त्या मागची भावना आहे. मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या, सातारा, कोल्हापूर, औंध, पुणे , मिरज संस्थानचा १९९४ च्या धर्तीवर जीआर काढा, मराठा आंदोलकांवरील सर्व सरसकट गुन्हे मागे घ्या, सारथी योजना पुन्हा सुरू करा, ज्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले त्यांना वैधता प्रमाणपत्र द्या, आदी दहा मागण्यांसाठी जरांगेंनी उपोषण सुरू केले होते.

उपोषणाचा निर्णय जाहीर करताना जरांगे पाटील खूपच आक्रमक होते. रणरणत्या उन्हात आमरण उपोषण करणार आहे, पाणी सुध्दा घेणार नाही, काय होईल ते होऊ दे. आता होणारे उपोषण खूप कडक असेल. वेदनांचा मी विचार करणार नाही. मंडप न टाकता मी उपोषणाला बसणार आहे. उष्माघाताने माझा मृत्यु झाला तर त्याला जबाबदार सरकारच असेल.एक तर सरकारचा तुकडा पडेल किंवा माझ्या जीवाचा तुकडा पडेल, या भूमिकेवर मी आलो आहे, अशा शब्दात त्यांनी निर्धार व्यक्त केला होता. आजवरच्या कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी दिले नाही, असे भरभरून माप मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठा समाजाच्या पदरात टाकले आहे.त्याची आकडेवारी बोलकी आहे. पण काही कायदेशीर अडचणी किंवा तांत्रिक त्रुटींमुळे अंमलबजावणीला विलंब होत असेल तर,पाहिजे तर मला गोळ्या घाला पण मागण्या मान्य झाल्याशिवाय आपण मागे हटणार नाही, अशी ताठर भुमिका घेणे कितपत योग्य आहे ? ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या पैकी ३९ लाख जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहे, उर्वरीत प्रक्रिया चालू आहे, मग सरकारवर विश्वास ठेवायला नको का? आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत ही मागणी समजता येईल पण पोलिसांवर हल्ले करणाऱ्या सर्वांवरील गुन्हे मागे घ्यायचे का? सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार जात पडताळणीसाठी विभागिय आयुक्त दर पंधरा दिवसांनी बैठक घेणार, सातारा ग'झेटसाठी सरकारला एक महिन्याची मुदत, न्या. शिंदे समितीला एक वर्षांची मुदतवाढ हे जरांगे यांनी मान्य केले आहे.आंदोलनातून सरकारवर दबाव ठेवता येतो हे खरे असले तरी चर्चेच्या माध्यमातूनच तोडगा निघू शकतो.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

# पुण्यात काँग्रेस नगरसेवकांचे सुप्रिया सुळेंना खडे बोल

## राजकारण



### स्थानिक निवडणुकात विश्वसात नाही, आता कशाला आम्हाला गृहीत धरता?

पुण्यात विधान परिषद निवडणुकीसंदर्भात काँग्रेस भवनमध्ये आयोजित नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांना खडे बोल सुनावले. जिल्हा परिषद, महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीकडून आमची कोंडी करण्यात आली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन लढते, आमच्या उमेदवारांना पराभूत केले, आता आमची मदत कशाला हवी? असा त्यांनी जाब विचारला. यानिमित्ताने महाविकास आघाडीत मतभेद चव्हाट्यावर आले.

पुण्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीकडून विक्रम काकडे यांच्यारूपाने अजित पवार राष्ट्रवादी विरुद्ध महाविकास आघाडीकडून शरद पवार राष्ट्रवादीचे श्रीकांत पाटील यांच्यात लढत होत आहे. श्रीकांत शिंदे यांच्यासाठी खा. सुळे यांनी महाविकास आाडीची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस मोहन जोशी, अंकुश काकडे, चंदू कदम, विशाल तांबे, काका चव्हाण, अविनाश बागवे, रफिक शेख, अनिता इंगळे उपस्थित होते.

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



महाविकास आघाडीची एकजूट दाखविण्यासाठी मंगळवारी काँग्रेस भवन येथे खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. मात्र, व्यासपीठावर ऐक्याचे संदेश दिले जात असताना बंद दाराआड झालेल्या चर्चेत काँग्रेस नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केल्याची चर्चा आहे. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतील कटू अनुभव, काँग्रेसविरोधात उभे राहिलेले 'राष्ट्रवादी'चे उमेदवार हे मुद्दे काही नगरसेवकांनी सुप्रिया सुळे यांच्यासमोर उपस्थित केले. त्यामुळे 'मविआ'तील धुसफूस संपली नसल्याचे स्पष्ट झाले. अनेक नगरसेवकांनी गत निवडणुकांतील अनुभव मांडताना नाराजी व्यक्त केली. महाविकास आघाडीचा भाग असतानाही आमच्या विरोधात उमेदवार का उभे करण्यात आले, भविष्यात महापालिकेत 'राष्ट्रवादी'ची नेमकी भूमिका काय राहणार आहे, असा थेट सवाल काहींनी उपस्थित केल्याचे समजते.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'महाविकास आघाडी म्हणून आम्ही पुणेकरांच्या प्रश्नांसाठी एकत्रितपणे लढणार आहोत. महापालिकेतील विरोधकाची भूमिका अधिक प्रभावी करण्याचा आमचा प्रयत्न असेल.' काँग्रेसच्या नवनियुक्त शहराध्यक्ष दीप्ती चवधरी यांनीही महाविकास आघाडीतील ऐक्यावर भर दिला.

काँग्रेसचे पुणे (पूर्व) शहराध्यक्ष प्रशांत जगताप या बैठकीला अनुपस्थित राहिल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. मात्र, जगताप यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, '१२ ज्योतिर्लिंग आणि चारधाम यात्रेचे नियोजन तीन महिन्यांपूर्वीच केले होते. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार सध्या धार्मिक यात्रेवर असल्याने बैठकीस उपस्थित राहता आले नाही.'

दरम्यान, बैठकीतील चर्चेनंतर शहरातील विविध प्रलंबित प्रश्नांवर संयुक्तपणे संघर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार १२ जून रोजी महाविकास आघाडीचे प्रमुख नेते पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेणार आहेत. या बैठकीला खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील, काँग्रेस व राष्ट्रवादीचे नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### दोन्ही राष्ट्रवादीची लुटूपुटूची लढाई; आम्ही कशाला मधे पडायचे?

काँग्रेस कार्यकर्त्यांनी बैठकीत खा. सुप्रिया सुळे यांना तुमची भूमिका स्पष्ट करा, असे सांगितले. अजूनही दोन्ही राष्ट्रवादी एकत्रिकरणाच्या चर्चा सुरूच आहेत. त्यातच बारामतीत कुटुंब म्हणून दोन्ही राष्ट्रवादीचे नेते एकत्र येतात. त्यावेळी महाविकास आघाडीच्या विचारांना तिलांजली मिळत नाही का? सुनेत्राताई पवार यांच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीने महाविकास आघाडीधर्म कुठे पाळला? महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत तुमची आघाडी आणि काँग्रेसने मात्र महाविकास आघाडीधर्म पाळून तुमच्या उमेदवाराचा प्रचार कसा करायचा? असा जाबही नगरसेवकांनी विचारला. आता दोन्ही राष्ट्रवादीची आमने-सामने लढाई नव्हे तर लुटूपुटू लढाई आहे. यात माजी खासदार संजय काकडे, विक्रम काकडे यांचे पवार कुटुंबाशी सलोख्याचे संबंध माहीत आहेत. मग आम्ही कशाला दोघांच्या मध्ये पडायचे, असाही खडा सवाल करण्यात आला.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ अधिक ज्येष्ठशके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास-अधिक
ज्येष्ठ ऋतु- सौर ग्रीष्म कृष्ण पक्ष तिथि:तृतीया २१:२१:३०
नक्षत्र : पूर्वाषाढा २४:५९:२७+ योग : शुभ ०८:११:३७
करण : वणिज ०८:१२:१९ करण : विष्टि २१:२१:३० सूर्य : वृषभ
चन्द्र : धनु हिजरी सन् - १४४७ मुस्लिम मास - जिल्हेज
तारीख - १७ विशेष

## राशी भविष्य...

राशिफल

**मेष** उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल. जोखमीची कामे शक्यतो आज करू नका.

**वृषभ** आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिध्दी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मिथून** जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा प्रारंभ होण्याचा योग आहे. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील.

**कर्क** आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**सिंह** आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

**कन्या** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. नवीन वस्तु विकत घेण्याचे योग आहेत. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**तूळ** चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या. मान सन्मान मिळण्याचे योग आहेत.

**वृश्चिक** आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**धनू** जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्ते बाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मकर** मनोधर्ये वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**मीन** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील. वाहन चालवतांना सावधानी बाळगा. आरोग्य चांगले राहील.

## पारावरचा फड



सांगली-सातारासह राज्यातील सर्वच १७ विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीधर्माचा जयघोष सर्वच नेत्यांनी सुरू केला आहे. ज्या मतदारांच्या जिवावर ही निवडणूक पार पाडली जाणार आहे. त्यांनी निवडून येण्यासाठी नगरपालिका, जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीत एकमेकांविरोधात सर्वत्रच लढाई केली, त्यात एकमेकांच्या गचोटीला धरण्यापासून त्यांचा पाडाव करण्यासाठी आता साद घालणारे नेते धावले होते हे सर्व 'युतीधर्माच्या नावावर विसरायचे असं नेत्यांचं फर्मान आहे. वास्तविक ज्या कार्यकर्त्यांच्या जिवावर हे केलं त्यांना काय वाटतं याचा विचार त्यांनी करायचा नाही म्हणे. अगदीच काय सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीत पालकमंत्री शंभूराजे देसाईंना धक्काबुक्की, मकरंदआबा यांची मानहानी लगेच विसरायची म्हणे. राजकारणात मतभेद असले तरी शंभूराजे व मी चांगले मित्र आहोत, असा जयाभाऊ गोरेंनी काढलेला 'कोडगा' सूर अनेकांच्या भुवया उंचावून गेला. एकूणच राजकारणात सबकुछ माफ आहे, याबाबत पारावरची चर्चा!

**बाबूराव :** राजकारनात कदी, काय बी कायम नसतंया बग. ईधानपरिषद इलेक्शान ह्येचं चांगलं उदाहरन हाय.

**पांडूनाना :** व्हय, आरं दोन-आडीच म्हन्याआगुदर म्हनं पोलिसांच्या दंडुकशाहीनं साताऱ्याच्या पालकमंतरी शंभुराजास्नी मारहान झाली. शिंदेशेनेचं आमदार महेश शिंद्यांनी आपला पक्षादेश मोडून भाजपसंगं जात कारभारनीला आद्यक्श केलं. त्येचा उदय सामंतसायबानं साताऱ्यात आमीबी दाकवू असा सूर काडला.

**बाबूराव :** व्हय, आरं ते लोकास्नी करमनूक आन् कार्यकरत्यास्नी तापिवन्यासाटी आसतंया.

**पांडूनाना :** खराय तुजं, म्हन आता म्हायुती एक हाय, ईधानपरिषदेला समद्यानी एकसंद ऱ्हावून जिकायचं.

**बाबूराव :** आरं, मग त्या जयाभाऊचं बंदू शेकरभाऊनं कुनाचं घोडं मारलं हुतं? त्येनी कशापाई शंभुबाजाचं आन् मकरंद आबाचं वाकडं घेटलं?

**पांडूनाना :** त्येंचं काय घिऊन बसलायस?

**बाबूराव :** ईधीमंडळ सभागृहात ह्येंच्या हानामारीचं गुराळ झालं, बिचाऱ्या एसपीसायबास्नी निलंबन करन्यापासनं बदलीपातुर समदं नाटक कशापाई केलं?


**पांडूनाना :** आरं ती त्यायेळची गरज हुती. कार्यकर्त्यांचा रोष शांत करायपायी फडनवीस, शिंदेसायबानं आन् सुनेतराताईनं ठरवून केलं हुतं.

**बाबूराव :** व्हय, तसं आसंल तर सांगलीत तानाजी पाटील म्हाईकास आगाडीसंगं गेल्यात त्ये कसं चालतं?

**पांडूनाना :** त्यी बी गरज हुती त्यायेळची. त्येंच्यावर तर कुटं शिंदेसायबानं कारवाई केली?

**बाबूराव :** राजकारनात हे चालतंयाच.**– अमृत चौगुले**

## उपदेश कथा




**निरपराधित्व आणि शत्रुत्व**

एका राज्यात भारतद्वाज पक्षी राहात होता, तो नेहमी सगळीकडे फिरत असत, त्या राज्यात पारध्यांचे प्रमाण भरपूर होते ते नेहमीच पक्षी पकडत असत, एक भारद्वाज पक्षी एका पारध्याच्या जाळ्यात अडकला.

तो पारध्याला म्हणाला, 'दादा, मी तुझा असा कोणता अपराध केला आहे म्हणून तू मला मारतोस? मी तुझं सोनं चोरलं नाही तर धान्याचे चार दाणे मात्र घेतले. पण पारध्याने त्याच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्याची मान मुरगाळली व त्याला आपल्या टोपलीत टाकले.

**कथा उपदेश : एकदा शत्रूच्या हाती सापडल्यानंतर आपले कितीही निरपराधित्व सिध्द केले तरी उपयोग होत नाही.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

२००६ - इराकचे माजी राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन यांना १९८२ सालच्या दुजैल हत्याकांड प्रकरणी मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. दुजैल हत्याकांड म्हणून प्रसिध्द असलेल्या या घटनेत १४८ शियांची हत्या करण्यात आली होती. सद्दाम यांना ३० दिवसांत फाशी देण्याचे आदेश इराकी न्यायालयाने दिले.

२००६ - आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीत ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज यांच्यातील अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने विंडीजचा ८ गडी राखून पराभव करून विजेतेपद पटकावले.

२००७ - अर्जेंटीनाच्या एका कारागृहात आग लागून २९ कैद्यांचा मृत्यू झाला.

**राष्ट्रीय**

१५५६ - पाणीपतच्या दुसऱ्या लढाईत मुघलांनी हिंदूना हरविले.

१८१७ - दुसरे बाजीराव पेशवे व इंग्रज यांच्यामध्ये इतिहास प्रसिध्द खडकीची लढाई झाली.

१९२९ - मुंबई-ठाणे या लोहमार्गावर विजेवर चालणाऱ्या आगगाड्या सुरू झाल्या.


१९३१ - बादशहा पंचम जॉर्ज यांच्या भेटीसाठी दरबारी रिवाज सोडून काढून आपल्या नेहमीच्या उपरणे-पंचा या वेशातच महात्मा गांधी त्यांना भेटायला गेले.

### केरळमचा १९ वर्षीय तहसीन फुटबॉल संघात!

भारतीय फुटबॉल प्रेमींमध्ये हळूहळू फुटबॉलचा ज्वर वाढत चालला आहे. त्याचे कारण म्हणजे ११ जून ते १९ जुलै २०२६ या कालावधीत अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा या तीन देशांत संयुक्तपणे भरवली जाणारी २३वी फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धा! १९३० पासून आजतागायत जगातील एकूण ८० देशांनी किमान एकातरी विश्वचषकात सहभाग घेतला आहे. भारत आजवर 'फिफा' या फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत एकदाही खेळलेला नाही. कारण भारतात क्रिकेटपुढे इतर खेळांप्रमाणेच अनेक कारणांमुळे फुटबॉल हा खेळ काहीसा मागेच आहे. सहा महिन्यांपूर्वी भारतात आलेल्या अर्जेंटिनाच्या जगप्रसिध्द फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या देशभरात झालेल्या अभूतपूर्व स्वागताने ते दिसून आले होते. भारतातील केरळम, गोवा, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील मिझोरम, मणिपूर आणि मेघालय या राज्यांमध्ये फुटबॉल खेळ खोलवर रुजलेला आहे. विशेष म्हणजे यंदाच्या फिफा फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघ नसला तरी भारतीय वंशाचा, मूळचा केरळमचा एक खेळाडू १९ वर्षीय तहसीन मोहम्मद जमशीद हा कतारच्या राष्ट्रीय फुटबॉल संघातून खेळणार आहे. प्रामुख्याने डाव्या बाजूने खेळणारा (लेफ्ट विंगर) तहसीन हा मैदानावरील एक वेगवान आणि अत्यंत लवचिक असा खेळाडू म्हणून ओळखला जातो. कतारच्या राष्ट्रीय फुटबॉल संघात त्याची निवड झाल्यामुळे केरळमच्या आणि संपूर्ण भारतीय फुटबॉल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, मुंबई**

## जन की बात...



### टि ई टी परिक्षेला आंदोलनाची गरज नाही?

सध्या प्राथमिक स्तरावरील शिक्षकांना टि ई टी परिक्षा अनिवार्य करण्यात आलेली आहे. न्यायालयानंच ती आणलेली असून त्यावर पुनर्विचार याचिका टाकण्यात आली होती. तिही फेटाळण्यात आलेली असून ती फेटाळण्यात विद्यार्थी भवितव्य व हित ही बाब विचारात घेतलेली आहे. मात्र आता शिक्षकात गुपचूप चर्चा आहे की सदर स्वरुपाची परिक्षा ही प्राथमिक शिक्षकांनाच का? माध्यमिक विभागाला का नाही? अल्पसंख्याक शाळेतील शिक्षकांना का नाही? एवढंच नाही तर जी मंडळी देश चालवितात. त्या मंत्री, आमदार, खासदार यांना तशा स्वरुपाची परिक्षा का नाही? अन् शेवटी ज्यांनी टि ई टी परिक्षेचा निकाल दिला. त्या न्यायाधीशांनाही तशा स्वरुपाची परिक्षा का नाही? यावर खरंच विचार व्हावा. खरं तर त्या सर्वांचीच तशा स्वरुपाची परिक्षा घ्यायला हवी होती. ही शिक्षकांच्या मनातील गुपचूप चालत असलेली चर्चा. चर्चा बरोबर जरी असली तरी त्यांचं आज कोणीच ऐकणारं नाही. कारण ते गावखेड्यातील मुलांना घडविणारे शिक्षक आहेत. त्यांना कितीतरी अनुभव जरी जास्त असला तरी तो कामाचा वाटत नाही. त्याचंही एक कारण म्हणजे सरकारी प्राथमिक शिक्षकांची संख्या वाढलेली आहे. तसे त्यांचे वेतनही वाढलेले आहे. त्यामानानं प्राथमिक शाळेत शिकणारी मुलं कमी झालेली आहेत. ती कॉन्व्हेंटला जात आहेत. ज्यातून शिक्षकांचे वेतन देण्यात सरकारचा जास्त पैसा खर्च होतो. तो देणं परवडत नाही. त्यासाठी शिक्षक कमी करायचे आहेत. त्याचं माध्यम सरकारला टि ई टी वाटतंय. ज्यातून पात्र न ठरणाऱ्या शिक्षकांची संख्या निश्चीतच कमी करता येईल. जेणेकरुन शिक्षकांना देण्यात येणारं वेतन निश्चीतच कमी होईल. हे शिक्षकाच्या गुपचूपच्या वार्तालापातील मत. यावर विचार होणे गरजेचे आहे. पुढ जावून आपल्याला समजेल टि ई टीतून शिक्षक गाळले जाणार आहेत की तसेच सेवेत ठेवले जाणार आहेत का ते.

अलिकडील काळात जनगणना सुरु आहे भारताची. तिही भर उन्हाळ्यात सुरु आहे. ज्यात तापमान हे सर्वोच्च स्थानावर पोहोचलेले आहे. त्यातच विदर्भाचा विचार केल्यास सांगता सोय नाही. सध्या विदर्भातील तापमान सर्वोच्च स्तरावर पोहोचलेले आहे. जनगणना, मतगणना या शिक्षकांच्या माथ्यावर असणाऱ्या नव्हे तर पडणाऱ्या गोष्टी. मग उन्हाळा असो की पावसाळा असो, शिक्षकांना ती कामं करावीच लागतात.

**–विशाखा कदम, सांगली**

### पंतप्रधान मोदींच्या कार्याची तपपूर्ती

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या पंतप्रधान पदाची दिनांक २६ मे रोजी बारा वर्षे पूर्ण केली. या तपपूर्तीचे वर्णन अनेकांनी केले आहे . स्वातंत्र्यानंतर देशाला एक कुशल , आत्मविश्वास पूर्ण पंतप्रधान लाभला आहे २६ मे २०१४ रोजी त्यांनी प्रथमतः पंतप्रधान पदाची शपथ घेतली होती . त्या नंतर २०१९ मध्ये त्यांनी दुसऱ्यांदा शपथ घेतली व २०२४ मध्ये ते तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. मोदी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला मनाचे स्थान मिळवून दिले अनेक देशांशी त्यांनी अत्यंत चांगले संबंध निर्माण केले. बीजेपी पक्षाची त्यांनी साऱ्या भारतभर प्रसिध्दी मिळवून अनेक राज्यात सत्ता मिळविली. आज देशातील एकूण २९ राज्यांपैकी बीजेपी शासित राज्ये २२ आहेत. हे सारे यश मोदींच्या कुशल नेतृत्वाला आहे. कोरोना काळात त्यांनी अत्यंत कुशलतेने राज्यशकट हाताळला . अनेक देशांना त्यांनी मदतीचा हात पुढे केला. या काळात अर्थव्यवस्था कमालीची खराब झाली होती. मोदी यांनी पुन्हा अर्थव्यस्थेला बळ दिले. आज जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या नंबर आहे जनधन योजना सुरु करून गरीब कुटुंबाला पैशाचे व बचतीचे महत्व पटवून दिले या योजनेत ५० कोटी पेक्षा जास्त खाती उघडली आहेत संरक्षण उत्पादनात उचांग गाठून अनेक देशात त्याची निर्यात केली. सन २०२३-२४ मध्ये आपण १०४ देशात २०९२५ कोटींची निर्यात केली. देशाची अर्थव्यस्था जगात पाचव्या नंबरवर नेण्याची कामगिरी केली.

**– शांताराम वाघ, पुणे**

# लग्नाच्या वादातून दुहेरी हत्याकांड; मुलानेच घेतला वडील आणि भावाचा जीव

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** वडील लग्न लावून देत नाहीत या कारणावरून, चिडून मुलाने वडिलांचा व सख्ख्या भावाचा खून केल्याची घटना जुन्नर तालुक्यातील बगाडवाडी पारगाव तर्फे मढ येथे बुधवारी दि.३ रोजी सकाळी उघडकीस आली.

जयराम महादू मुकणे वय ६५ वर्षे,राजू जयराम मुकणे वय ३० वर्षे दोघे रा.बगाडवाडी, पारगाव तर्फे मढ ता.जुन्नर जि.पुणे अशी खून झालेल्या इसमांची नावे आहेत.

याप्रकरणी ओतूर पोलिसांनी आरोपी बाबजी जयराम मुकणे वय ३२ वर्षे रा. बगाडवाडी, पारगाव तर्फे मढ ता.जुन्नर जि.पुणे याला अटक करण्यात आले असून,त्याच्याविरोधात दुहेरी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे हे माहिती देताना म्हणाले की,जयराम महादू मुकणे हे बगाडवाडी,पारगाव तर्फे मढ येथील लक्ष्मण गोविंद कदम यांचे शेतामध्ये असलेल्या



पत्राशेडमध्ये दि.२ रोजी रात्री नऊ ते दि.३ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यानआरोपी बाबजी जयराम मुकणे याने त्याचे लग्न लावून न दिल्याचे कारणावरून त्याचे वडील जयराम महादु मुकणे तसेच त्याचा भाऊ राजु जयराम मुकणे वय ३० वर्ष दोघांना लाकडी चोपणीने मारहाण करून,त्यांच्या डोक्यात दगड टाकुन त्यांचा खुन केला आहे.

याप्रकरणी मयताचा मुलगा युवराज जयराम मुकणे याने ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने आरोपी बाबजी जयराम मुकणे याच्या विरोधात दि.३ जून रोजी भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल,अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार,उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे हे करत आहेत.

## एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात योग्य नियोजन करा : तालुका कृषी अधिकारी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** एल निनोपार्श्वभूमीवर होणाऱ्या हवामानावर बदलामुळे आपल्या भागात पाऊस कमी जास्त पडणे, पावसाचा खंड पडणे आणि पावसाचे असमान वितरण होणे अशी शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. बियाणे उगवण, फुल फळ, धारणांबावर विपरीत परिणाम होऊन उत्पादनामध्ये होण्याची शक्यता आहे, एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे.

कोरडवाहू शेती करण्याऱ्यांनी जमिनीची कमीत कमी हलवाहलव करून पेरणी करावी तसेच भारी मध्यम जमिनीत पेरणी रुंद सरी वरंबा पद्धतीने करणे, कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या पिकांना वा वाणांचा प्राधान्य देणे. लहरी हवामानात शेतीमधील जोखीम कमी करण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. जमिनीची जलधारणा क्षमता वाढवण्यासाठी मूळस्थानी जलसंधारण वा जलतारा-शोषखड्डे शेतामध्ये राबवावेत.

पाणी व्यवस्थापन साठी ठिबक व तुषार सिंचन संचाचा वापर करणे, रासायनिक खतांवर पूर्णपणे अवलंबून न राहता सेंद्रिय, जैविक खताचा वापर प्रामुख्याने कीडरोग व्यवस्थापन एकात्मिक करावे. ७५-८५ मिलिमीटर पाऊस पडल्यानंतर पुरेशी ओल असताना पेरणी करणे. लहरी हवामानामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. कृषी सल्ला, हवामान अंदाज, बाजारभाव साठी महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे महाविस्तार ॲप चा वापर करावा.

## वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना पुण्याचा ब्राह्मणभूषण पुरस्कार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** 'आम्ही सारे ब्राह्मण' व 'ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका'पुणे या नियतकालिकांच्या वर्धापनदिनी दि. १९ जून २०२६ रोजी, टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे संध्याकाळी ५.३० वाजता पुरस्कार प्रदान समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न होत असून, यामध्ये वेदमूर्ती देवव्रत रेखे यांना यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मानपत्र, पुणेरी पगडी आणि भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

काशी येथे शुक्ल यजुर्वेदातील सुमारे २००० मंत्रांचे अत्यंत दुर्मिळ 'दण्डक्रम पारायण' ५० दिवसांत पूर्ण करून इतिहास रचणारे १९ वर्षीय वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे यांना



यंदाचा 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार देण्यात येत आहे. देवव्रत रेखे यांच्या या ऐतिहासिक कामगिरीनंतर अनेक मोठे विद्वन आश्चर्यचकित झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या तरुण वेदमूर्तींचे अभिनंदन केले आहे. यंदाचा इंदुमती-वसंत करिअर भूषण पुरस्कार माध्यम तज्ज्ञ, व्याख्याते व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवउद्योजक विनायक पाचलग यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये १० हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. रामचंद्र देखणे स्मृती कीर्तनकार पुरस्कार नव्याने सुरू केला आहे. यंदाचा युवा कीर्तनकार पुरस्कार ह.भ.प. अमृता कळंबेळकर यांना जाहीर झाला आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे. तसेच ब्राह्मण समाजासाठी प्रदीर्घ काळ काम करणार्या संस्थेला 'भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येत आहे. यावर्षीचा पुरस्कार 'कर्हाडे ब्राह्मण संघ, पुणे' या संस्थेला ९६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल देण्यात येणार आहे. रोख रुपये ५ हजार व स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे.

## चतुर्थी निमित्त हजारो भाविकांनी घेतले श्री विघ्नहराचे दर्शन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**नारायणगाव :** अष्टविनायकांतील महत्वाचे स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर येथे आज संकष्टी चतुर्थी निमित्ताने हजारो भाविकांनी श्री विघ्नहराचे दर्शन घेतले.

पहाटे ५ वाजता श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे,उपाध्यक्ष तुषार कवडे,सचिव सुनील घेगडे,खजिनदार दत्तात्रय कवडे विश्वस्त सुर्यकांत रवळे,प्रकाश मांडे,विक्रम कवडे,गोविंद कवडे,विनायक मांडे,समीर मांडे,मंगेश पोखरकर,संतोष कवडे,विलास कवडे,विनायक



जाधव,शिल्पाताई जगदाळे यांच्या शुभहस्ते श्रींना महाअभिषेक पूजा करून दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. मंदिरामध्ये चतुर्थी बरोबर आदिक मास शुभमुहूर्त असल्याने महाआरती करण्यात आली. महाआरतीचा मान.अविनाश वाघुले,विनय बनकर,प्रतिक लंभाटे,डॉ. अमोल चौधरी,कुणाल पादिर,दिपक कोकणे,विवेक घंगाळे यांना मिळाला.

पहाटे पाच ते अकरा वाजे पर्यंत रांगेत सुमारे एक लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. सकाळी ७.०० वा. व दुपारी १२.०० वा. मध्यान्ह आरती करण्यात आली. सकाळी ८.०० वा. नियमित पोथी वाचन करण्यात आले.सकाळी



१०.३० वा.''श्री स नैवद्य दाखवून भाविकांना खिचडी वाटप श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट च्या वतीने करण्यात आली. आज संकष्टी चतुर्थी निमित्ताने विघ्नहर मंदिरात फुलांची आरस, विघ्नहराला रेशमी जरीचा पोशाख करण्यात आला होता. तसेच सोन्याचे अलंकार श्री विघ्नहराला परिधान करण्यात आले. व येणाऱ्या भाविकांसाठी मंदिरात दर्शनरांग,पाणी पिण्याचे व्यवस्था,अभिषेक व्यवस्था. देणगी कक्ष ,अभिषेक करण्यासाठी शमी वृक्षाखाली व्यवस्था, तसेच कमी वेळेतील दर्शनासाठी मुखदर्शन व्यवस्था इत्यादी व्यवस्था करण्यात आली. सायंकाळी ७.०० वा. नियमित हरिपाठ करण्यात आले. व चंद्रोदयापर्यंत कीर्तनकार ह.भ.प.गणेश महाराज हिंगे,अवसरी यांचे हरिकीर्तन झाले. त्यांना साथसंगत श्रीराम प्रसादिक भजनी मंडळ शिरोली यांनी दिली.

## आकुर्डीतील हॉटेल मॅजेस्टिक परिसरातील १२ हजार चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील सर्वे क्रमांक ७/१/१ब, आकुर्डी येथील हॉटेल मॅजेस्टिक परिसरातील अनधिकृत आरसीसी बांधकामे व पत्राशेड यांच्यावर आज निष्कासन कारवाई करण्यात आली.

'अ' क्षेत्रीय कार्यालयाच्या धडक कारवाई पथकामार्फत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हॉटेल मॅजेस्टिक तसेच परिसरातील अनधिकृत आरसीसी बांधकामे



व पत्राशेड हटविण्यात आले. या कारवाईमध्ये एकूण सुमारे १२ हजार चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. सदर कारवाई महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली 'अ' क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे यांच्या नियंत्रणाखाली पार पडली. या कारवाईमध्ये प्रशासन अधिकारी प्रिया गोरखे, बांधकाम परवानगी विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे यांच्यासह उपअभियंते, कनिष्ठ अभियंते तसेच 'अ' क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक सहभागी होते. याशिवाय निगडी पोलीस ठाण्याचे २० पोलीस कर्मचारी, महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील २० कर्मचारी, 'अ', 'क' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतील महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, महापालिका मजूर यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्र देशात टॉपर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**मुंबई :** छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्याच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत दि. २९ मे रोजी देशात आतापर्यंतचे एका दिवसातील सर्वाधिक १५ हजार घरांवर प्रकल्प बसविण्यात आले असून त्यापैकी ४,७०० घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्राने प्रथम क्रमांक मिळविला. या यशाबद्दल केंद्रीय नवीकरणीय ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांनी महाराष्ट्राचे अभिनंदन केले असून राज्याने ६ लाखापेक्षा अधिक घरांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दलही कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीने वेग घेतला आहे. मे महिन्यात योजनेसाठी सादर अर्जांमध्ये देशात प्रथम क्रमांक, प्रकल्प बसविलेल्या एकूण घरांमध्ये दुसरा क्रमांक, प्रकल्पांच्या तपासणीमध्ये पहिला क्रमांक आणि पुरवठादारांच्या नोंदणीमध्ये दुसरा क्रमांक अशा रितीने या योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात सर्वोच्च कामगिरी करणाऱ्या पाच टॉपर राज्यांमध्ये समाविष्ट झाला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेची राज्यात महावितरणमार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. या यशाबद्दल राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरगुती वीज ग्राहकांना घराच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी थेट अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅटसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. या योजनेच्या अंमलबजावणीत वीज ग्राहकांकडून अर्जांची स्वीकृती, प्रत्यक्ष प्रकल्प बसविणे आणि त्याची तपासणी करून तो सुरू करणे हे तीन महत्त्वाचे टप्पे असतात. मे महिन्यात या योजनेसाठी देशभर विशेष अभियान चालविण्यात आले होते त्यामध्ये महाराष्ट्र राज्य टॉपर ठरले आहे.

## फुलेप्रेमी कवीच्या कुटुंबाला तीन लाखांची आर्थिक मदत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** बुलढाणा जिल्ह्यातील केळवद येथील अल्पभूधारक शेतकरी, तसेच फुलेप्रेमी कवी शाहीर मनोहर पवार यांचा शेतातील आंब्याच्या झाडावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. ते देशातील पहिली मुलींची शाळा भिडेवाडा आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियान व आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हलच्या फुलेप्रेमी परिवारातील सक्रिय सदस्य होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या आकस्मिक निधनामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या काळात फुलेप्रेमी कवी-कवयित्रींनी मदतीचा हात पुढे केला.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या समतावादी विचारधारेवर श्रद्धा ठेवून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत कार्य करणाऱ्या कवी-कवयित्रींना 'फुलेप्रेमी कवी' म्हणून ओळखले जाते. मनोहर पवार हे अशाच विचारांचे कार्यकर्ते व कवी होते. भिडेवाडाकार फुलेप्रेमी संविधान दूत कवी विजय वडवेराव यांनी मनोहर पवार यांच्या कुटुंबासाठी आर्थिक मदतीचे आवाहन



केल्यानंतर देशभरातील फुलेप्रेमी कवी-कवयित्रींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अवघ्या तीन दिवसांत तीन लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आला.

पवार यांच्या दहाव्याच्या विधीच्या दिवशी केळवद येथे आयोजित कार्यक्रमात विजय वडवेराव यांनी समाजबांधवांच्या उपस्थितीत तीन लाख रुपयांचा धनादेश पवार यांच्या पत्नी आणि दोन्ही मुलींकडे सुपूर्द केला. या मदतीमुळे कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळाला असून मुलींच्या शिक्षणासाठीही मदत होणार आहे. सहकारी कवीच्या निधनानंतर साहित्यिक आणि सामाजिक बांधिलकी जपत देशभरातील कवींनी एकत्र येऊन त्यांच्या कुटुंबासाठी तीन लाख रुपयांचा निधी उभारल्याची ही उल्लेखनीय घटना ठरली आहे. यावेळी विजय वडवेराव, अरविंद बनसोडे, संजय हिवाळे, डॉ. मंजू गौतम राजे-जाधव, मारोती कदम यांच्यासह फुलेप्रेमी कवी, ग्रामस्थ, कुटुंबीय, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होता.


## अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे तातडीने भरा; योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे निर्देश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**मुंबई :** शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे कालमर्यादेत तातडीने भरण्याची प्रक्रिया गतीमान करावी. तसेच विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अबू आझमी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले, तर आमदार सना मलिक-शेख, आमदार रईस शेख उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख उपस्थित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री



सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य शासन विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय आणि परिणामकारक पद्धतीने कार्य करणे आवश्यक आहे. त्या पुढे म्हणाल्या की, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, विशेषतः मुलींसाठी उच्च व तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, ही काळाची गरज आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून त्याद्वारे समाजाच्या प्रगतीला नवी दिशा मिळू शकते.

बैठकीत 'मार्टी' (MARTI) संस्थेशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेच्या कामकाजाला अधिक बळकटी देणे, प्रशिक्षण व शैक्षणिक उपक्रमांची व्याप्ती वाढविणे तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत विविध मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला.

अल्पसंख्याक समाजातील युवकांना आधुनिक शिक्षण प्रणाली, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाशी जोडण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. रोजगाराभिमुख प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि कौशल्यवृद्धी कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्यावर शासनाचा विशेष भर राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. याशिवाय, हज समितीमधील जागेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करावा, तसेच प्रलंबित विषयांचा पाठपुरावा करून त्यांचा लवकरात लवकर निपटारा करावा, असे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने काम करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले.

## भीमा-पाटस साखर कारखान्याच्या कोट्यवधींच्या घोटाळ्याला जबाबदार कोण?

### प्रभारी कार्यकारी संचालकांचे 'बेकायदेशीर' अस्तित्व वादाच्या भोवऱ्यात?

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** भीमा-पाटस सहकारी साखर कारखान्यात सध्या कारभाराचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून, कारखान्याची मालमत्ता लुटली जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे. कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक तुषार पवार यांची नियुक्तीच बेकायदेशीर असताना ते मागील ३ ते ४ वर्षांपासून या खुर्चीला चिटकून बसले आहेत. या काळामध्ये त्यांनी अनेक नियमबाह्य निर्णय घेतल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे.

साखर आयुक्त कार्यालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, सध्या रिक्त असलेल्या कार्यकारी संचालक पदावर प्रभारी म्हणून काम करणाऱ्यांची नियुक्ती रद्द करण्यात येत आहे. तरीही पवार हे या पदावर कायम राहून कारभार हाकत आहेत, हे आश्चर्यकारक आहे. कारखान्याच्या गोदामात प्रत्यक्षात एकही साखर पोते शिल्लक नसताना केवळ कागदोपत्री कारभार दाखवून सुमारे १ लाख साखर पोत्यांचा अपहार केल्याचा गंभीर आरोप रमेश थोरात यांनी केला आहे. २०१८-१९ च्या गळीत



हंगामापासून झालेल्या या साखर विक्रीची तातडीने चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. केवळ साखरच नव्हे, तर कारखान्यात आता मोठ्या प्रमाणावर स्क्रॅप चोरी झाल्याचे प्रकरण उघडकीस आले असून, यामुळे सभासद आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. या चोरीत प्रभारी कार्यकारी संचालकांचा हात असावा, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

कारखान्यावर प्रशासकाची नियुक्ती होऊनही १७-१८ दिवस उलटले तरी, प्रभारी संचालकांनी अद्याप चार्ज सोपवलेला नाही. बरखास्त झालेल्या संचालक मंडळाच्या आशीर्वादानेच कारखान्याची मालमत्ता लुटली जात असल्याचा आरोप आता जनतेतून होत आहे. या संपूर्ण गंभीर प्रकरणाची साखर आयुक्त कार्यालयाने तात्काळ दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी. तसेच, या बेकायदेशीर कृत्यात सामील असलेल्या प्रभारी कार्यकारी संचालकांसह पडद्यामागच्या सर्व सूत्रधारांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी तीव्र मागणी आता दौंड तालुक्यातून होऊ लागली आहे.

## संक्षीप्त वृत्त

### उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर शहर विभाग यांच्या पथकाचा ०२ गावठी हातभट्टी दारू अड्ड्यांवर छापा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** मा. पोलीस अधीक्षक सौ. श्री. मुम्मका सुदर्शन, अहिल्यानगर तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक सौ. श्री. वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०१ जून २०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर शहर विभाग यांच्या पथकाने कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी गावठी हातभट्टी दारू अड्ड्यांवर छापेमारी कारवाई केली.

गाडगीळ पटांगण, भाजी मार्केट तसेच नेप्ती नाका अमरधाम परिसरात भिंतीच्या आडोशाला बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची तयार दारू साठवून विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करत इसम नामे १) अतुल रावसाहेब दातरंगे (वय ३२, रा. गाडगीळ पटांगण, नालेगाव, ता. जि. अहिल्यानगर) व २) रमाकांत रामभाऊ शिवगण (वय ५९, रा. आदर्शनगर, लोंढे वस्ती, अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले. या कारवाईत एकूण ७५ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू जप्त करण्यात आली असून तिची किंमत अंदाजे ७ हजार ५०० रुपये इतकी आहे. जप्त करण्यात आलेली दारू जागीच नष्ट करण्यात आली. सदर प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### जगद्धात्री आणि शिवाय अखेर खरोखरीच लग्नबंधनात अडकतील?

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** झी टीव्हीवरील 'जगद्धात्री' ही मालिका आपल्या रोचक कथानक आणि उत्कंठावर्धक नाट्यमय वळणांमुळे सतत चर्चेत आहे. नुकतेच या मालिकेने २०० भाग पूर्ण करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. ह्या मालिकेला प्रेक्षकांकडून मिळालेल्या प्रचंड प्रेम आणि पाठिंब्याचाच हा पुरावा आहे. गेल्या काही वर्षांत शिवाय (फर्मान हैदर) आणि जगद्धात्री (सोनाक्षी बत्रा) यांच्यातील अनोख्या नात्याशी प्रेक्षक विशेषत: जोडले गेले आहेत. पारंपरिक टीव्ही प्रेमकथांपेक्षा वेगळी असलेली त्यांची ही कहाणी विश्वास, साथ, त्याग आणि अबोल भावना अशा अनेक गोष्टींवर आधारित आहे. त्यामुळेच ही जोडी प्रेक्षकांच्या सर्वांत आवडत्या ऑन-स्क्रीन जोड्यांपैकी एक ठरली आहे. अलीकडेच मुख्य कलाकार फर्मान हैदर आणि सोनाक्षी बत्रा यांनी इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर करून चाहत्यांमध्ये खळबळ उडवली आहे. या फोटोमध्ये शिवाय हा जगद्धात्रीच्या कपाळावर कुंकू (सिंदूर) लावताना दिसत आहे, त्यामुळे या आवडत्या जोडीच्या आयुष्यात पुढे काय होणार याबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

### यादें मालिकेत कृष्णा भारद्वाजची एन्ट्री

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सोनी सब ची यादें मालिका भावनिक कथाकथन, रोचक वैद्यकीय प्रकरणं आणि अनपेक्षित वळणांमुळे प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवते. डॉ. देव मेहता (इक़बाल खान) आणि हॉस्पिटल टीम वेगवेगळ्या अनोख्या वैद्यकीय रहस्यांचा शोध घेत असताना, आता एक नवीन केस सगळ्यांना वास्तव आणि भ्रम यात फरक ओळखायला भाग पाडणार आहे.

कथानकात नवा ट्विस्ट आणत अभिनेता कृष्णा भारद्ज विशेष भूमिकेत दिसणार आहे सतेन्द्र तिवारी (सट्टू) म्हणून. त्याची गूढ अवस्था पाहून त्याच्या कुटुंबीयांसह डॉक्टरही उत्तर शोधत आहेत. सगळ्यांना वाटतं की तो आपल्या मृत पत्नीच्या आत्म्याने पछाडला आहे, पण डॉ. देव आणि हॉस्पिटल टीम खरं काय घडतंय हे शोधण्यास कटिबद्ध आहेत. जसजसे तपशील समोर येतात, तसतसे हे प्रकरण अधिक गोंधळात टाकणारं ठरतं. प्रत्येक नवीन क्ल्यू नवे प्रश्न निर्माण करतो आणि लवकरच सट्टूचं प्रकरण हॉस्पिटलने पाहिलेल्या सर्वात विचित्र रहस्यांपैकी एक बनतं.

### भाऊसाहेब गमे यांचे निधन



■ जनप्रवास वार्ताहर

**पुणतांबा :** येथील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब बन्सीधर गमे ( ६८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्या मागे पत्नी एक मुलगा तीन मुली नातवंडे भाऊ असा मोठा परिवार आहे, गणेश कारखान्याचे माजी शेतकी अधिकारी शिवाजीराव तसेच सामाजिक कार्यकर्ते संभाजी गमे यांचे ते बंधू होत,

### अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर भव्य शिवराज्याभिषेक सोहळा



■ जनप्रवास प्रतिनिधी

**रायगड :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक राज्याभिषेक दिनानिमित्त अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीतर्फे दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून २०२६ रोजी भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आल आहे. समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा पार पडणार आहे. शिवराज्याभिषेक सोहळा भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन, धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची, जागर शिवशाहिरांचा.. स्वराज्याच्या इतिहासाचा आणि सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा ही यंदाच्या सोहळ्याची मुख्य आकर्षणे असणार आहेत. दि. ६ जून १६७४ रोजी दुर्गराज रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. या सुवर्णक्षणातून हिंदवी स्वराज्याची अधिकृत स्थापना झाली आणि महाराष्ट्राने स्वातंत्र्याचा पहिला हुंकार दिला. या ऐतिहासिक दिवसाची स्मृती जागवण्यासाठी प्रतिवर्षी रायगडावर भव्य राज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. शुक्रवार, दि. ५ जून रोजी दुपारी ३.३० वाजता पाचाड येथील राजमाता जिजाऊ साहेबांच्या समाधीस्थळी अभिवादन करून सोहळ्याची सुरुवात होणार आहे. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत नाणे दरवाजातून गड चढाईला प्रारंभ होईल.


# ज्येष्ठांचा गौरव, भक्तिरसाचा संगम; निंबवीतील अभिष्टचिंतन सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** निंबवी येथील सरपंच काकासाहेब शिर्के यांचे वडील पोपटराव सर्जेराव शिर्के व मातोश्री रतनबाई पोपटराव शिर्के यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवाराने उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम संस्मरणीय केला. ज्येष्ठांचा सन्मान, सामाजिक बांधिलकी आणि अध्यात्मिक वातावरण यांचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला.

शिर्के परिवाराने या निमित्ताने गावातील सर्व समाजघटकांना एकत्र आणत ज्येष्ठ व्यक्तींचा गौरव करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. विशेषत: निंबवी गावातील ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी दिलेल्या त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाला आळंदी येथील ह.भ.प. माधव बाबा इंगोले हे आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. त्यांच्या प्रभावी व समाजप्रबोधनपर कीर्तनाने उपस्थितांना भक्तिरसाचा आनंद दिला. कीर्तनातून अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. त्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.



याशिवाय निंबवी येथील शिवरामबाबा भजनी मंडळाने भजन व धार्मिक कार्यक्रम सादर करून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या सुमधूर सादरीकरणामुळे कार्यक्रमाला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक रंग प्राप्त झाला.

या प्रसंगी युवा नेते दिग्विजय नागवडे, नागवडे कारखान्याचे संचालक विठ्ठल बापू जंगले, माजी दूध संघाचे अध्यक्ष सुरेश नाना लोखंडे, डॉ. चंद्रकांत पंदरकर, राज्य उपनेते रावसाहेब रोहकले, राष्ट्रीय शिक्षक संघाचे अध्यक्ष आबासाहेब जगताप, अविनाश निंभोरे तसेच परिसरातील विविध गावांचे सरपंच, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राध्यापक राजेंद्र शिर्के, घोडेगाव सोसायटीच्या अध्यक्षा शुभदा मचे यांच्यासह अनेक मान्यवरांनी शिर्के कुटुंबियांचे अभिनंदन केले. ज्येष्ठांचा गौरव, सामाजिक एकोप्याचा संदेश आणि धार्मिक वातावरण यामुळे हा सोहळा विशेष ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा कार्यक्रम सामाजिक सलोखा आणि संस्कारांचे दर्शन घडविणारा ठरला.

कार्यक्रमाची सांगता ह.भ.प. माधव बाबा इंगोले यांच्या कीर्तनाने झाली. प्राध्यापक सतीश शिर्के यांनी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

## माजी सैनिक युनूस टेंगे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अहिल्यानगर अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिर्डी येथे आयोजित जिल्हास्तरीय मेळाव्यात माजी सैनिक युनूस टेंगे यांची अहिल्यानगर जिल्हा अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे नेते व खासदार संजय राऊत यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

शिर्डी येथे झालेल्या या मेळाव्यास विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार सुनील शिंदे यांच्यासह



पक्षाचे पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्हा शिवसेनाप्रमुख राजेंद्र दळवी यांच्या शिफारशीनुसार युनूस टेंगे यांची अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. युनूस टेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक माजी सैनिकांनी यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. यामध्ये माजी सैनिक शेख अकबर, संदीप काकडे, राजमोहम्मद शेख, साजिद हवलदार, दिनकर गायकवाड, कृष्णा खेडकर यांच्यासह अनेक माजी सैनिक उपस्थित होते.

## बनावट UTR आणि बाऊन्स धनादेशाद्वारे ४१ लाखांची फसवणूक; दोघांविरोधात कोतवालीत गुन्हा दाखल

■ जनप्रवास वार्ताहार

**अहिल्यानगर :** मारुती सुझुकीचे अधिकृत डीलर असलेल्या महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रा. लि. शोरूमची तब्बल ४१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट UTR नंबर, एडिट केलेले पेमेंट स्क्रीनशॉट आणि वारंवार बाऊन्स होणारे धनादेश देत आरोपींनी शोरूम व्यवस्थापनाची दिशाभूल केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याबाबत शुभम संजय शिंदे (रा. सदर बाजार, भिंगार, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रा. लि. शोरूममध्ये अकाउंटंट म्हणून कार्यरत असून संबंधित शोरूम हे मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडचे अधिकृत डीलर आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी संतोष त्रिंबक दळवी यांनी महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज शोरूममधून MH16DP3496, MH16DP3497, MH16DP3520, MH16DP3498 d MH16DP3501 अशा पाच वाहनांची खरेदी केली होती. या व्यवहारासाठी पवन गुरुनाथ पांडव यांनी त्यांच्या नावाचा ४१ लाख रुपयांचा धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश बँकेत सादर केल्यानंतर अपुऱ्या शिल्लक रकमेअभावी नामंजूर झाला.

दि. ०८ एप्रिल रोजी पवन पांडव यांनी व्हॉट्सॲपद्वारे तुमचे पैसे खात्यात जमा होतील, आमच्या खात्यातून रक्कम डेबिट झाली आहे, असा संदेश पाठवून बनावट व्यवहाराचे स्क्रीनशॉट शेअर केले. मात्र प्रत्यक्षात शोरूमच्या खात्यात कोणतीही रक्कम जमा झाली नसल्याचे तपासात स्पष्ट झाले. या प्रकरणी पवन गुरुनाथ पांडव (रा. निमल नगर, डोके नगर शाळेसमोर, सावेडी, अहिल्यानगर) व संतोष त्रिंबक दळवी (रा. भगवान निवास, निमल नगर, सावेडी, अहिल्यानगर) यांच्याविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तेजश्री थोरात करत आहेत.

## अनिल शेंगाळे यांची पोलीस हवालदारपदी पदोन्नती; सर्वच स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळीभान :** अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात तब्बल १६ वर्षे उल्लेखनीय सेवा बजावणारे धडाडीचे पोलीस अंमलदार अनिल शेंगाळे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची मोठी पावती मिळाली आहे. जिल्हा पोलीस दलात 'पोलीस नाईक' म्हणून कार्यरत असणाऱ्या शेंगाळे यांना 'पोलीस हवालदार' पदावर पदोन्नती (प्रमोशन) देण्यात आली आहे. या पदोन्नतीमुळे त्यांच्यावर सर्वच स्तरांतून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मूळचे जुन्नर (जिल्हा पुणे) तालुक्यातील नळवणे गावचे रहिवासी असलेले आणि सध्या राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे स्थायिक असलेले अनिल शेंगाळे शिक्षणाची उत्तम पार्श्वभूमी आणि खाकी वर्दीची असलेली आवड यांमुळे त्यांनी नगर जिल्हा पोलीस दलात भरती



होऊन आपल्या पोलीस सेवेचा यशस्वी प्रवास सुरू केला. १३ वर्षे गोपनीय विभागात मोलाचे योगदान आश्वी पोलीस स्टेशन, श्रीरामपूर ग्रामीण पोलीस स्टेशन या ठिकाणी त्यांनी अत्यंत चोखपणे कर्तव्य पार पाडले. सध्या ते अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर येथे अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीवर कार्यरत आहेत.

त्यांच्या या गौरवपूर्ण पदोन्नतीबद्दल श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त धोंडे तसेच आप्पासाहेब खंडाळ आणि राजेंद्र गोडगे पोलीस हवालदार रविंद्र चव्हाण, रामेश्वर ढोकणे, सचिन धनाड, रामेश्वर वेताळ, काका मोरे, संदीप दरंदले, किशोर हिंगे, संभाजी वरे, सचिन शेळके, सतिष पठारे आदी वरिष्ठ अधिकारी व सहकाऱ्यांनी अनिल शेंगाळे यांचे विशेष कौतुक करत त्यांना पोलीस हवालदार पदाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## विश्वकर्मा संघटनेच्या कार्यक्रम पत्रिकेचे हभप देविदास महाराज मस्के यांच्या हस्ते प्रकाशन

■ जनप्रवास : प्रतिनिधी

**नेवासा :** विश्वकर्मा वंशिय समाज संघटन अहिल्यानगर परिवाराच्यावतीने गुणवंत विद्यार्थी सन्मान व समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रमाच्या पत्रिकेचे प्रकाशन ह भ प वेदांताचार्य देविदासजी महाराज मस्के यांच्या शुभहस्ते श्री ज्ञानेश्वर मंदिरात करण्यात आले.

यावेळी विश्वकर्मा वंशिय समाज संघटनेचे राज्य संघटक राजकुमार राऊत,राज्य प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, राज्य



संपर्कप्रमुख भगवान राऊत, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रसाद गडकर, सचिव अशोक गोरे,जिल्हा प्रवक्ता सुभाष तमानके, नेवासा तालुका अध्यक्ष रवींद्र मोरे, उपाध्यक्ष संचित प्रधान,तालुका सचिव संकेत नांगरे,बाळासाहेब खामकर,माजी जिल्हा अध्यक्ष रावसाहेब मोरे, जेष्ठ सदस्य भाऊसाहेब राऊत, किरण मोरे, बीडचे राजेंद्र ससाने आदी उपस्थित होते.

विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने गेल्या ११ वर्षापासून समाज हिताचे अनेक उपक्रम राबविले जातात त्यातीलच विद्यार्थी गुणगौरव व समाज रत्न पुरस्कार वितरण समारंभ हा देखील अत्यंत स्तुत्य असा उपक्रम आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल, त्याचबरोबर समाजातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा समाजरत्न पुरस्कार देऊन सत्कार होणार असल्यामुळे त्यांनाही आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचे बळ मिळेल असे मला वाटते अशा शब्दात ह भ प देविदास महाराज मस्के यांनी ररश्रि प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

## अनुदानित बियाणे वितरणासाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**बारामती :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांच्या उत्पादन वाढीसाठी नवीन व अधिक उत्पादनक्षम वाणांच्या प्रसारासाठी खरीप हंगामात 'प्रमाणित बियाणे पुरवठा हा घटक राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत बारामती तालुक्यात तूर, मूग, बाजरी, सोयाबीन, सूर्यफूल व भुईमूग या पिकांचे अनुदानित दरात बियाणे शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अथवा जवळच्या महा-ई-सेवा/सुविधा केंद्रामार्फत तातडीने ऑनलाइन अर्ज करावेत. बियाणे वाटप 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर करण्यात येणार असून अर्जासाठी फार्मर आयडी असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त एक हेक्टर क्षेत्रासाठी अर्ज करता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# 'साहेबराव वाबळे पुन्हा संचालक म्हणून यावेत'

## सभापती सुधीर नवले सेवापुर्ती समारंभात हमाल, व्यापारी, कर्मचारी यांचा अश्रूंचा बांध फुटला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवडगाव :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव साहेबराव वाबळे हे ३१ मे २०२६ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला भावपूर्ण निरोप समारंभ आज (दि. ३ जून) बाजार समितीच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सभागृहात मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला.

यावेळी बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, माजी संचालक किशोर कालंगडे यांच्यासह व्यापारी, हमाल, मापाडी, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या सचिवपदाच्या कार्यकाळात साहेबराव वाबळे यांनी बाजार समितीत मोठ्या प्रमाणात विकासकामे राबवून समितीचा नावलौकिक जिल्ह्यासह राज्यभर वाढविला. कर्मचारी, हमाल, मापाडी, व्यापारी आणि शेतकरी यांच्यात समन्वय साधत त्यांनी पारदर्शक, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध कारभार केला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे बाजार समितीने



विकासाच्या अनेक टप्प्यांवर यशस्वी वाटचाल केली.

समारंभात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत साहेबराव वाबळे यांनी पुन्हा एक्सटेन्शनवर सचिव म्हणून बाजार समितीत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांनी आपल्या भाषणात, ''साहेबराव वाबळे हे सचिव पदावरून जरी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांनी पुन्हा राजकारणात सक्रिय होऊन बाजार समितीवर संचालक म्हणून यावे आणि आपल्या अनुभवाचा लाभ संस्थेला द्यावा,'' अशी अपेक्षा व्यक्त केली.

निरोप समारंभादरम्यान वातावरण अत्यंत भावूक झाले होते. बाजार समितीच्या इतिहासात प्रथमच एका सचिवाच्या निरोप समारंभात हमाल, मापाडी, व्यापारी आणि कर्मचारी यांच्या अश्रूंचा बांध फुटल्याचे चित्र पाहायला मिळाले. आपल्या सहकाऱ्यांचे प्रेम आणि जिव्हाळा पाहून साहेबराव वाबळे यांनाही अश्रू अनावर झाले. बाजार समितीच्या इतिहासातील सर्वात मोठा आणि संस्मरणीय निरोप समारंभ म्हणून या कार्यक्रमाची नोंद झाली असून, उपस्थितांनी साहेबराव वाबळे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# राहुरी कृषी विद्यापीठात कंत्राटी मजूर श्रीकांत दोंदे याचा निर्घृण खून

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी कृषी विद्यापीठात कंत्राटी मजूर असलेल्या श्रीकांत दोंदे या २७ वर्षीय तरुणावर अज्ञात आरोपीने धारदार शस्त्राने १० ते १५ वार करून निर्घृण हत्या केल्याची घटना दि. २ जून रोजी रात्रीच्या दरम्यान गोटूंबे आखाडा परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली.

श्रीकांत पोपट दोंदे, वय २७ वर्षे, रा. गोटुंबे आखाडा, ता. राहुरी असे मयत तरुणाचे नाव आहे. श्रीकांत दोंदे हा कापूस सुधार प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावरील कार्यालयात ठेकेदाराकडे कंत्राटी मजूर सायंकाळी ५ ते १ या वेळेत कार्यरत होता. श्रीकांत दोंदे हा दि. २ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास नेहमी प्रमाणे घरातून निघून कामासाठी कार्यालयात गेला होता. दरम्यान त्याच ठिकाणी कार्यरत असलेले दुसरे कंत्राटी मजूर बंडू बर्डे हे रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास ड्युटीवर गेले. त्यावेळी श्रीकांत दोंदे हा नेहमीच्या ठिकाणी त्याचे अंथरून असलेल्या ठिकाणी दिसला नाही. त्यांनी परिसरात बॅटरीच्या प्रकाशात शोध घेतला असता कार्यालयाच्या पाठीमागील बाजूस श्रीकांत दोंदे हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती विद्यापीठाचे सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे यांना देण्यात आली. त्यानंतर राहुरी पोलिसांना कळविण्यात आले.

त्यावेळी श्रीरामपूर येथील उप विभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर, राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस उप निरीक्षक लवांडे, सहाय्यक फौजदार तुलसीदास गिते, पोलीस हवालदार अर्जुन दारकुंडे, सुरज गायकवाड, प्रमोद ढाकणे यांच्यासह



मयत- श्रीकांत पोपट दोंदे

श्वान पथक व फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणातून श्रीकांत दोंदे याच्यावर तीक्ष्ण हत्याराने १० ते १५ वार करून त्याची निर्घृण हत्या केल्याची शक्यता प्रथम दर्शनी व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर पोलिस पथाकाने दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती समजली.

मयत श्रीकांत दोंदे याच्या नातेवाईकांनी दि. ३ जून रोजी सकाळी राहुरी पोलीस ठाण्यात येऊन या हत्याकांड दोन ते तीन आरोपी असून त्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करुन फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली. हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र सदर घटना ही अनैतिक संबंधातून झाल्याची परिसरात चर्चा सुरु आहे.

मयत श्रीकांत दोंदे याच्या पश्चात आई-वडील, भाऊ व बहीण असा परिवार आहे. या घटनेमुळे गोटुंबे आखाडा व राहुरी विद्यापीठ कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली. या प्रकरणी राहुरी पोलीस पथक अज्ञात आरोपींचा शोध घेत आहे.

# निमगाव वाघात एस.टी. प्रवास सवलतींसाठी स्मार्ट कार्ड नोंदणी

## एकता फाऊंडेशनच्या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद; ज्येष्ठ नागरिक व महिलांनी घेतला लाभ

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथे एकता फाऊंडेशनच्या वतीने ग्रामस्थांच्या सोयीसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासासाठी आवश्यक असलेल्या स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच विविध घटकांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ग्रामपंचायत कार्यालयासमोर असलेल्या नवनाथ मंदिराच्या सभामंडपात हे शिबिर पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना एसटीच्या योजनांचा लाभ सहजपणे मिळावा आणि प्रवासासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरादरम्यान महिलांनी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्मार्ट



कार्डसाठी नोंदणी केली. या कार्डच्या माध्यमातून महिलांना एस.टी. प्रवासात ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार असून ज्येष्ठ महिला व पुरुषांनाही अर्ध्या तिकिटाची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच वयोवृद्ध नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत प्रवासाचा लाभ घेण्यासाठीही हे स्मार्ट कार्ड उपयुक्त ठरणार आहे.

या प्रसंगी निमगाव वाघा विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन तथा एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, बाबासाहेब जगदाळे, भाऊसाहेब (पिंटू) जाधव, अजय ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, सुधीर येणारे, सुनील कापसे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतुल फलके म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध सवलती आणि सुविधा सहज उपलब्ध करून देण्यासाठी एकता फाऊंडेशनच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे, हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. अनेक वेळा आवश्यक कागदपत्रे, माहितीचा अभाव किंवा प्रवासाची अडचण यामुळे नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. हीच अडचण दूर करण्यासाठी एकता फाऊंडेशनने हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी सांगितले.

# केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य; मोठ्या आस्थापनांवर कचऱ्याचे विलगीकरण व परिसरातच प्रक्रिया बंधनकारक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** शहरातील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या बल्क वेस्ट जनरेटर्स (बीडब्ल्यूजी) यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) केंद्रीकृत ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य असून, नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या निवासी संकुले, हॉटेल्स, मॉल्स, शैक्षणिक संस्था, रुग्णालये तसेच व्यावसायिक आस्थापनांसाठी सीपीसीबी पोर्टलवरील नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे. या माध्यमातून कचरा निर्मिती, विलगीकरण आणि प्रक्रियेवर केंद्रीकृत पद्धतीने देखरेख ठेवली जाणार आहे. सीपीसीबीचे केंद्रीकृत घनकचरा व्यवस्थापन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले असून सर्व पात्र बल्क वेस्ट जनरेटर्सनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, शहरातील स्वच्छता आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांनी स्वतःच्या परिसरात कचऱ्याचे विलगीकरण व प्रक्रिया करणे आवश्यक आहे. सीपीसीबी पोर्टलवरील नोंदणी ही कायदेशीर जबाबदारी असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध नियमानुसार कारवाई केली जाईल.

महापालिकेचे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल म्हणाले, महापालिकेकडून संबंधित आस्थापनांना नोंदणी आणि कचरा व्यवस्थापन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

# विश्वबंधुतेचा ध्यास घेतलेल्या रोकडे यांचे जीवन दिशादर्शक

## ॲड. प्रार्थना सदावर्ते यांचे मत; विश्वबंधुता परिवारातर्फे पंचरंगी कार्यक्रमातून विश्वबंधुतेचा जागर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** "विश्वबंधुतेचा विचार केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीतून समाजात रुजविण्याचे कार्य प्रकाश रोकडे यांनी आयुष्यभर केले आहे. पाच दशकांहून अधिक काळ विश्वबंधुतेचा ध्यास घेऊन समर्पित भावनेने बंधुतेचा विचार पेरणाऱ्या रोकडे यांच्या जीवनप्रवासातून समाजाला प्रेरणा आणि दिशा मिळते," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद, विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती आणि काषाय प्रकाशन यांच्या वतीने बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त विश्वबंधुता दिन, प्रकाश रोकडे यांचे अभिष्टचिंतन, 'विश्वधर्म बंधुता' ग्रंथाचे प्रकाशन, काव्य संमेलन आणि पुरस्कार वितरण अशा पंचरंगी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित कार्यक्रमात जयवंत शिक्षण प्रसारक मंडळीच्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. वसंत बुगडे, ज्येष्ठ कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, डॉ. अशोककुमार पगारिया, बंधुता प्रकाशनाच्या संचालिका मंदाकिनी रोकडे, कादंबरीकार प्रा. शंकर आथरे आणि कवयित्री संगीता झिंजुरके आदी उपस्थित होते. जयवंत शिक्षण प्रसारक मंडळाच्या हडपसर येथील जयवंत पब्लिक स्कुलमधील विद्यार्थी व शिक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती. विश्वबंधुता



काव्यसंमेलनामध्ये महाराष्ट्रातील २५ नामवंत कवी सहभागी झाले होते. निशा खापरे (नागपूर), वैशाली मोहिते (पुणे), पूनम सोनवणे (बारामती), भगतसिंग दंडवते (पनवेल), गिरीजा भुमरे व आर. पी. शिखरे (छत्रपती संभाजीनगर), दीपक नागरे (वाशीम), रुचिरा बेटकर (नांदेड), पंडित निंबाळकर (कोपरगाव), संध्याराणी कोल्हे (धाराशिव), देवीलाल वैराळे (अमरावती) व पोपटराजे कुंभारकर (सांगली) या १२ साहित्यिकांना 'विश्वबंधुता प्रकाशदूत' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ॲड. प्रार्थना सदावर्ते म्हणाल्या, "विश्वबंधुता, मानवता आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा प्रसार करणारे साहित्य समाजाला नवी दिशा देते.

# सोशल मीडियावरील जनगणनेच्या अफवांपासून सावध राहा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## जनगणना प्रक्रिया पूर्णतः डिजिटल आणि पारदर्शक; नागरिकांना अपप्रचाराला बळी न पडण्याचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी:** पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या 'जनगणना २०२७'च्या घरसूचीकरण व घरगणना सर्वेक्षणासंदर्भात सोशल मीडियावर दिशाभूल करणारे संदेश, अफवा आणि अप्रमाणित माहिती प्रसारित होत असल्याने नागरिकांनी अशा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने केले आहे. जनगणनेची संपूर्ण प्रक्रिया ही अधिकृत, पारदर्शक आणि पूर्णतः डिजिटल पद्धतीने राबविली जात असून, कोणत्याही खोट्या माहितीस बळी पडू नये, असे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.

सोशल मीडियावर जनगणना प्रक्रियेबाबत विविध प्रकारची अप्रमाणित माहिती आणि खोटी संकेतस्थळे प्रसारित होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक यांच्या माध्यमातूनच जनगणनेचे काम सुरू आहे. या प्रक्रियेत कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता मोबाईलवरील अधिकृत 'एचएलओ ॲप'द्वारे ऑनलाइन स्वरूपात माहिती नोंदविली जात असल्याचे शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले. महापालिकेच्या माहितीनुसार, 'जनगणना २०२७'च्या पहिल्या टप्प्यातील घरसूचीकरण व घरगणनेच्या प्रत्यक्ष कामास १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. एचएलओ ॲपच्या माध्यमातून घरांचे सर्वेक्षण यशस्वीपणे पूर्ण करण्यात येत असून, ही प्रक्रिया सुरक्षित, अचूक आणि पूर्णतः डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचेही शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नमूद केले. प्रशासनाने नागरिकांना खोट्या संकेतस्थळांपासून आणि सोशल मीडियावरील अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. अचूक जनगणना ही शहर विकासाची भक्कम पायाभरणी असून, शाळा, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते आणि इतर नागरी सेवांचे नियोजन अचूक माहितीच्या आधारेच प्रभावीपणे करता येते, असे प्रशासनाने स्पष्ट केले. जनगणना अधिकारी केवळ आवश्यक माहिती नोंदवतात. ते कोणतेही आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा इतर सरकारी कागदपत्र, बँक तपशील अथवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत. नागरिकांनी दिलेली सर्व माहिती सुरक्षित आणि गोपनीय राखली जाते. त्यामुळे जनगणना कर्मचाऱ्यांना आवश्यक सहकार्य करून शहर विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

> सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अप्रमाणित माहिती, अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी केवळ अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. संपूर्ण जनगणना प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि डिजिटल स्वरूपात 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून राबविली जात असून नागरिकांनी विश्वासाने आणि जबाबदारीने आपला सहभाग नोंदवावा.
>
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> जनगणना २०२७ अंतर्गत माहिती संकलनाचे काम 'एचएलओ ॲप 'च्या माध्यमातून अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षकांमार्फत पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील अफवा किंवा अपप्रचारावर विश्वास न ठेवता अधिकृत जनगणना कर्मचाऱ्यांनाच सहकार्य करावे. जनगणना अधिकारी कोणतेही कागदपत्र, बँक तपशील किंवा मोबाईल ओटीपी मागत नाहीत.
>
> **– सचिन पवार, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# २० कोटी खर्चूनही प्राणिसंग्रहालयाला १० वर्षांपासून टाळेच!

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** प्रशासकीय अनास्था, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष आणि केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मान्यता मिळण्यासाठी होत असलेल्या विलंबामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे संभाजीनगर येथील बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय नूतनीकरणाच्या कामामुळे दहा वर्षांपासून पर्यटकांसाठी बंद आहे. आतापर्यंत २० कोटींचा खर्च करून पहिल्या दोन टप्प्यांतील स्थापत्यविषयक कामे पूर्ण झाली आहेत. तिसऱ्या टप्प्यातील कामाला अद्याप सुरुवात झाली नसून, आणखी वर्षभर संग्रहालयास टाळेच पाहावे लागण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पशुपक्ष्यांची माहिती व्हावी, या उद्देशाने महापालिकेने चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये 'एमआयडीसी'च्या सात एकर जागेमध्ये १९८९ मध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणिसंग्रहालय उभारले. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी मे २०१६ ला सुरुवात झाली. तेव्हापासून संग्रहालयाला टाळे आहे. प्राणिसंग्रहालयासाठी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्पोद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. संग्रहालयावर आतापर्यंत दोन टप्प्यांत २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. दहा वर्षे होऊनही प्राणिसंग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले नसून संग्रहालयास टाळे आहे.

### मोजकेच प्राणी शिल्लक

बहिणाबाई प्राणिसंग्रहालयात विषारी आणि बिनविषारी साप, अस्वल, अजगर, मगरी, कासव, मोर, बदक, पोपट, कॉकपीट, लव्हबर्ड असे विविध प्राणी, पक्षी होते. सध्या साप, मगर, मोर, घुबड, लव्हबर्ड आहेत. प्राणिसंग्रहालयाचे काम सुरू होण्याआधी काही प्राणी पुण्यातील प्राणिसंग्रहालयाला देण्यात आल्याचे सांगितले जाते.

### मान्यतेअभावी काम रखडले

तिसऱ्या टप्प्यात स्थापत्यविषयक, पाणी, लँडस्केपिंग, सीमाभिंतीची उंची वाढविणे, प्राण्यांच्या रुग्णालयातील कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी येणाऱ्या २४ कोटींच्या खर्चाला मार्च २०२५ मध्ये मान्यता देण्यात आली. परंतु, केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मान्यता मिळाली नसल्याने अद्याप काम सुरू करण्यात आले नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### दोन टप्प्यांत झालेले काम

विविध प्राण्यांसाठी प्राणी घाट, प्राणी घर आणि पिंजरा क्षेत्र, तसेच साहित्य ठेवण्यासाठीची खोली, कर्मचारी सदनिका, प्राणी जळण क्षेत्र आणि शवविच्छेदन क्षेत्र निवारा, प्रवेशद्वार, भूमिगत जलकुंभ (टाकी), तिकीटघर, संरक्षण भिंत, रंगकाम, टेन्साइल रूफिंग, संचालकांच्या निवासस्थानाचे नूतनीकरण आदी कामे पूर्ण झाली आहेत.

प्राणिसंग्रहालयातील तिसऱ्या टप्प्यातील काम सुरू करण्यास मान्यता मिळण्याकरिता केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाला पत्र पाठविले आहे. त्यांची मान्यता मिळताच कामाला सुरुवात करण्यात येईल.

# अनुसूचित जाती आरक्षण उप वर्गीकरणाच्या विरोधात १० जून रोजी राहुरी तहसील कार्यालयावर मोर्चा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी तालुका अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण कृती समितीच्या वतीने अनुसूचित जाती आरक्षण उप वर्गीकरणाच्या विरोधात मंगळवार दि. १० जून रोजी सकाळी ११ वाजता राहुरी तहसील कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नुकत्याच आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणामुळे



समाजातील विविध घटकांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याचा दावा करत या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृती समितीच्या वतीने करण्यात आले. तसेच शासनाने अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सदर पत्रकार परिषदेस समितीचे पदाधिकारी व समस्त आंबेडकरी कार्यकर्ते उपस्थित होते.

# राहाता शहराचे सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पथक तैनात

## नगरपालिका निवडणुकीत दिलेल्या शब्दाची डॉ. सुजयदादा विखे यांनी केली वचनपूर्ती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** महिला भगिनींची सुरक्षितता तसेच अवैध धंदे गुन्हेगार व टवाळखोरांचा बंदोबस्त करून शहराला सुरक्षितता प्रदान करण्याकरिता महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पोलीस पथक उपलब्ध करून देऊ हा शब्द भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय दादा विखे पाटील यांनी निवडणुकीत शहरवासीयांना दिला होता या शब्दाची वचनपूर्ती त्यांनी केली आहे नगरपरिषदेस राहाता शहरासाठी एमएसएफ चे महिला व पुरुष मिळून नऊ जवानांचे पथक शहरात दाखल झाले आहे अशी माहिती राहाता नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर यांनी दिली.

याबाबत माहिती देताना राहाता नगरपरिषदेचे लोकनियुक्त प्रथम नगराध्यक्ष डॉ.स्वाधीन गाडेकर म्हणाले की राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांनी दहशत व गुन्हेगार मुक्त सुरक्षित शहर निर्मितीवर भर दिला आहे त्या अनुषंगाने डॉ. सुजय दादा विखे पाटील यांच्या संकल्पनेतून शालेय महाविद्यालयीन युवती महिला भगिनी यांच्या सुरक्षिततेला अधिक महत्त्व दिले जात आहे या सुरक्षितते साठी चुकीचे कृत्य करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाईचे आदेश त्यांनी दिले आहेत राहाता शहरात कायदा सुव्यवस्था अधिक बळकट व्हावी गुन्हेगारी टवाळखोरी अवैध धंदे मोडीत निघून महिला भगिनी यांना अधिकची सुरक्षितता प्रदन व्हावी याकरिता डॉ



सुजय दादा विखे पाटील यांनी राहाता नगरपरिषद निवडणुकीत राहाता शहराच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पथक नगरपरिषदेस देऊ असा शब्द दिला होता तो शब्द काही महिन्यातच त्यांनी खरा ठरवला कृतीत आणला आणि दोन महिला व सात पुरुष जवानांचे पोलीस पथक राहाता शहरासाठी प्राप्त झाले असून सुरक्षिततेच्या दृष्टीने ते शहरात गस्त घालित आहे अर्थात तैनात आहे.

महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान हे सकाळी ८ ते दुपारी ४ आणि दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत अशा दोन वेळांमध्ये राहाता शहरामध्ये गस्त घालणार आहेत.

यामध्ये प्रामुख्याने शाळा, कॉलेज च्या प्रवेशद्वारावर गस्त, अवैध धंदे, गावठी दारू विक्री, रात्रीच्या वेळी भरधाव वेगाने गाडी चालविणाऱ्यांवर कारवाई, आडोसा असलेल्या जागी बसलेल्या मद्यपींवर कारवाई करणे , आठवडे बाजारामध्ये पाकिटमार, मोबाईल चोर यांच्यावर नजर ठेवणे आदी कामे केली जाणार आहेत. अशी माहिती नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी माध्यमांना दिली

याप्रसंगी उपनगराध्यक्ष डॉ विजय सदाफळ, मुख्याधिकारी वैभव लोंढे आणि नगरसेवक प्रवीण सदाफळ अजय आग्रे राहुल सदाफळ दशरथ तुपे संदीप मुर्तडक ॲड मयूर पाळंदे नितीन गाडेकर, माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ, माजी नगरसेवक भीमराज निकाळे,विजय गिधाड सुरेश माळी प्रभाकर आरणे, बाळासाहेब सदाफळ योगेश डांगे सुयोग शेळके प्रदीप बनकर अरुण गाडेकर आदी उपस्थित होते.

# स्त्रीचं आकर्षण वाटणं स्वाभाविक असतं

प्रौढ पुरुषानं पोरीच्या वयाच्या तरुणीशी लग्न करणं ही सगळ्या जगात सामान्य घटना मानली जाते. चार्ली चॅप्लिनसारख्या नटापासून नेल्सन मंडेलांसारखा गांधीवादी नेतासुद्धा ८० व्या वर्षी आपल्याहून चाळीस वर्षांनी लहान असलेल्या तरुणीबरोबर बिनदिक्कत लग्न करतो.

आपल्याकडे तर 'डिसेंबर-जानेवारी' विवाह किंवा जरठबाला विवाह पूर्वीपासून प्रचलित आहेत. स्त्रीवर वर्चस्व राखणं, तिला मुठीत ठेवणं या दृष्टीनं पुरुष नेहमीच आपल्याहून लहान वयाच्या स्त्रीशी विवाह करीत आला आहे. संकटं आणि आपत्ती सोसण्याची उपजत कुवत असल्यामुळे आणि एकूणच पुरुषप्रधान समाजात 'आवाज'च नसल्यामुळे स्त्री पदरी पडेल ते पुरुषरत्न परमेश्वर समजून सहन करीत गेली.

मात्र गेल्या दशकानं ही अन्याय विषमता संपवली शिक्षण व नोकरी यांच्यामुळे स्वावलंबी बनलेल्या आणि अस्मिता जागृत झालेल्या स्त्रीनं आपला जोडीदार आई-वडिलांच्या पसंतीनं निवडण्याऐवजी स्वत: निवडायला सुरुवात केली. याच दशकात स्त्री-पुरुष संबंधांबाबत समाजाच्या पूर्वीच्या कल्पना बदलल्या आणि त्यात त्यात औदार्य आलं. एकमेकांना भेटण्याच्या आणि निवड करण्याच्या मुभेमुळे स्त्री-पुरुष संबंधांच्या पारंपारिक कल्पना मागे पडल्या. पुरुष कमावती, स्वतंत्र व्यक्तीमत्वाची स्त्री जोडीदार म्हणून पसंत करु लागले.

या पिढीतल्या मुला-मुलींना शाळकरी वयापासून एकमेकांचा सहवास मिळतो. त्यामुळे आपला जोडीदार कसा असावा याबद्दल त्यांच्या काही निश्चित कल्पना असतात. हो ला हो करणारी, चारचौघात तोंड मिटून राहणारी पत्नी आजच्या तरुणाला आवडत नाही. ऑफिसमध्ये स्त्री-बॉसबरोबर काम करुन त्याला बुद्धिमान, तडफदार आणि स्वतंत्र व्यक्तीमत्व असलेल्या स्त्रियांबद्दल आदर वाटतो. बरोबरीची चंचल, अवखळ तरुणी त्याला जन्मभर साथ देऊ शकेल याची त्याला खात्री वाटत नाही.

या स्थितीत त्याला आपल्याहून मोठ्या वयाच्या स्त्रीचं आकर्षण वाटणं स्वाभाविक असतं. संभाषणचतुर कर्तृत्ववान, बुद्धिमान आणि नीटनेटकी व स्मार्ट अशी स्त्री मोठ्या वयाची असली तरी त्याला जोडीदार म्हणून हवीशी वाटते.



विशेषत: त्याचा पेशा फिरतीचा असेल, फार वेळ खाणारा असेल, तर मोठ्या स्त्रीचा त्याला भावनिक आधार वाटतो. अशी स्त्री त्याच्या अनपस्थितीत त्याचे आर्थिक व्यवहार, त्याचा बिझनेस , त्याचे आई-वडिल आणि त्याची मुल यांची उत्तम काळजी घ्यायला समर्थ असते. आपल्या लाडक्या सचिन तेंडुलकरचंच उदाहरण घ्या ना. मैदानावर व मैदानाबाहेरही लाखो करोडांचा हीरो असलेला सचिन क्रिकेटच्या निमित्तानं सतत दौऱ्यावर असतो. त्याची पत्नी अंजली समजूतदार आहे, पतीच्या तोडीस तोड मॅच्युअर आहे आणि त्यांच्या मुलांना तिनं एका हाती वाढवलं आहे म्हणणं गैर ठरणार नाही. मुद्दाम सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे अंजली सचिनपेक्षा पाच वर्षांनी मोठी आहे. अर्थात सचिनं काही हिशेब करुन तिच्याशी लग्न केलं नाही, पण त्याची निवड अचूक ठरली. प्रगल्भ व्यक्तीमत्वाच्या अंजलीमुळे सचिन कौटुंबिक चिंतांपासून मुक्त असतो आणि एकाग्र चित्तानं खेळू शकतो.

चित्रपटसृष्टीत तर अलीकडे मोठी स्त्री लहान पुरुष विवाहांची साथच आली आहे. अलीकडे बॉलिवूडमध्ये झालेल्या विवाहात अभिषेक ऐश्वर्या, शिल्पा शेट्टी राज कुंद्रा या विवाहांमध्ये पत्नी पतीपेक्षा वयान मोठी आहे. दिग्दर्शिका फराह खान हिचा पती शिरीष कुंडरे तर तिच्यापेक्षा ८ वर्षांनी लहान आहे; पण या तिन्ही जोडप्यांचे संसार सुरळीत चालू आहेत. दोघांपैकी कुणालाही वयातल्या अंतराबद्दल गंड नाही. दडपण नाही. वयाबद्दल गुप्तता बाळगण्याची गरज त्यांना भासत नाही.

मोठ्या वयाची पत्नी आमच्या मिठीत न राहता आपल्या मुठीत ठेवील, अशी भीती या पुरुषांना वाटत नाही. त्यांनी आपल्या पत्नीला त्यांच्या करिअर्स सांभाळण्याबाबत काहीही आडकाठी केलेली नाही. उलट राज कुंद्रा शिल्पाच्या राजस्थान रॉयल टीमध्ये तिचा बिझनेस पार्टनर बनला आहे. स्त्री- पुरुषांमधल्या सेक्शुऑलिटी'चा विचार करता, स्त्रीपेक्षा लहान असलेला पती काही काळानं तरुण सोबती शोभू लागलेल अशी भीती व्यक्त केली जाते. आपल्यापेक्षा १५ वर्षांनी मोठ्या असलेल्या जरीना वहाबशी लग्न करणाऱ्या आदित्य पांचोलीनं आणि वयात १२ वर्षांचं अंतर असलेल्या सैफअली खाननं अमृता सिंगला घटस्फोट देऊन ही भीती सिद्ध केली आहे, असं लोकांना वाटतं. सायकॉलॉजिस्ट श्रीमती चुग आणि सायकाट्रिस्ट समीर पारीख एकमतानं ही समजूत खोटी आहे असं सांगतात.

त्याचं म्हणणं आहे, फसवणूक वयावर अवलंबून नसते. परिस्थितीवर व स्वभावावर असते. बालिश आदित्य पांचोलीसारखे तरुण आपल्यापेक्षा १५ वर्षांनी लहान पत्नीशी जरीनापेक्षा वेगळा वागला नसता. आदित्यच्या उलट अभिषेक बच्चन व शिरीष कुंडेर हे वयानंच नाही तर नावलौकिकात आपल्याला अर्धांगीनीपेक्षा लहान आहेत; पण त्याचा त्यांना बिलकुल न्यूनगंड नाही आपल्याला पत्नीचं यश, त्यांची प्रसिद्धी यांचा त्यांनी सहजपणे स्वीकार केला आहे. शिरीषचं तर म्हणणं आहे. माझी पत्नी आणि माझा पेशा समान आहे; पण तिचं वय माझ्यापे मोठं आहे, याचा मला दिलासा वाटतो. श्रीमती चुग म्हणतात, 'माणसाला भावनिक स्थैर्य हवं असतं म्हणून तो लग्न करतो. पुरुष आपल्या पत्नीत आपली आई बघत असतो, तर स्त्रीला आपल्या पतीमध्ये आपले वडील दिसत असतात. जिथे पती-पत्नींना याची समज असते, तिथे संसार अत्यंत सुखाचा होतो. यशस्वी संसाराचा अन् काही एक संबंध नसतो. संबंध असतो समजूतदारपणाचा आणि विश्वासाचा. एकविसाव्या शतकात वयासारख्या मामुली गोष्टीचा कोणत्याच नात्यात विचार होता कामा नये.

# उशिरा लग्नाचा परिणाम म्हणजे अर्थातच उशिरा मातृत्व

उच्च शिक्षण त्यानंतर त्याला साजेशी नोकरी या गोष्टींचा भारतीय स्त्रीला लाभू मिळू लागला; पण त्यामुळे तिचं लग्नाचं वय वाढलं. करिअर राहोच, मेडिकलसारखं उच्च शिक्षण चालू असताना स्त्रीला लग्नाची आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या संसाराची जबाबदारी पेलणं अशक्य आहे.



साहजिकच आधीच्या दशकात २०/२१ व्या वर्षी लग्न करणारी भारतीय स्त्री आज कमीत कमी २५ वर्षांची होईपर्यंत लग्न करत नाही.३०/३२ व्या वर्षीपर्यंत लग्न न करणाऱ्या स्त्रियांची संख्या गेल्या ४-५ वर्षात खूप वाढल्याची माहिती एका सामाजिक पाहणीत नुकतचं सिद्ध झालं आहे.

उशिरा लग्नाचा परिणाम म्हणजे अर्थातच उशिरा मातृत्व ! हल्ली विवाहानंतर २ ते ३ वर्षे तरी जोडप्याला मूल नको असतं. यामुळे बऱ्याचदा आजची विवाहित स्त्री २९ ते ३५ च्या दरम्यान आई बनते. तिशीनंतरची गर्भधारणा प्रसूतीची प्रक्रिया अवघड असते. कारण या वयात ओटीपोटाचे स्नानू पहिल्यासारखे लवचिक राहिलेले नसतात. त्यामुळे प्रसूतीवेदना होऊ नयेत म्हणून सिझेरियन ऑपरेशन करुन स्त्रीची सुटका केली जाते.

सिझेरियन हा वेदनाविरहित प्रसूतीचा सुलभ मार्ग आहे यात शंकाचा नाही; परंतु तो उठसूठ वापरणं योग्य नाही. जिथे स्त्रीची प्रसूती लवकर होणं जवळपास अशक्य होतं, तेव्हाच सिझेरियन करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतले पाहिजे.

वेदनारहित प्रसूतीसाठी स्त्रिया सिझेरीनचा आग्रह धरतात, तेव्हा त्यांना त्याच्या परिणामांची कल्पना नसते. डॉक्टरांना ती असते; तरी त्यांची माहिती ते स्त्रियांना देत नाहीत. कारण सिझेरीयनमध्ये दुप्पट फी वसूल करता येते. कित्येकदा सिझेरियननंतर वर्षा-दोन वर्षांनीसुद्धा वाईट परिणाम आढळतात. सिझेरीन केलेल्या स्त्रियांना दोन वर्षानंतर शरीराला भयंकर सूज येणे, बधिरता किंवा कंप यासारखे त्रास झाल्याची उदाहरणं आहेत.

सिझेरियनची बाधा तान्ह्या मुलाला येत नाही, आईला मात्र होतो. करिअरमध्ये अडथळा येऊ नये म्हणून सिझेरियन करुन घेणाऱ्या स्त्रियांना सिझेरीयनच्या नंतरच्या त्रासामुळे वारंवार रजा घेण्याची वेळ येते. ऑपरेशनच्या वेळी दिलेली भूल आणि औषधे यांचा विपरीत परिणाम सिझेरियन झालेल्या स्त्रीवर बऱ्याचदा दिसतो. मूत्रपिंड किंवा गर्भाशयाचा संसर्ग आणि मोठा रक्तस्त्राव मूत्रमार्गाला जखम, श्वसनाला त्रास हे काही कॉमन आजार आहेत.

सगळ्यात वाईट, सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे पहिलीच प्रसूती सिझेरियनची केली, तर त्यानंतर नैसर्गिग प्रसूती अशक्य होऊन बसते. पुढच्या प्रसूतीलाही सिझेरीयन लागतं. सिझेरियनच्या ऑपरेशनमध्ये शरीराची कातडी, पेशींचे आतले संरक्षक थर, पोटाना स्नायू, गर्भाशियाचे स्नानू हे सर्व विलग होतात. मूळ पदाला येण्यासाठी हे सर्व भाग भरुन येणं आवश्यक असतं.

ही क्रिया होत नाही तोवर स्त्रीला निरनिराळे त्रास राहतात. स्नायूंची ओढाताण, दबाव, शरीर विशेषत: पोट जड वाटणं, ही लक्षणं तिला बेजार करत राहतात. तज्ज्ञ डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, नैसर्गिक प्रसूतीमध्ये नक्कीच जास्त वेदना आहेत. त्या स्त्रीलाच काय, पुरुषाला सहन करणंसुद्धा कठीण आहे. सिझेरियनमुळे स्त्रीची प्रसववेदनेतून लवकर सुटका होत असल्यामुळे त्याचा मोह पडतो. त्यात काही चूक नाही; पण दूरगामी दीर्घकालीन दुष्परिणाम पाहाता स्त्रियांनी सिझेरियनऐवजी नैसर्गिक प्रसूतीला पसंती द्यावी. त्यामुळे त्या मातृत्वाचा आनंद घेऊ शकतील आणि नैसर्गिक प्रसूतीमध्ये दुष्परिणमांची शक्यता कमी असल्यामुळे, योग्य तेवढी विश्रांती घेऊन त्या त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात विना व्यत्यय, विना वेदना काम करु शकतील.

# आळशी, उधळी, व्यसनी माणसांच्या सहवासात राहू नये

मानवावर संगतीचा परिणाम चटकन होतो आणि तारुण्यावस्थेतच माणसाचा व्यक्तिमत्त्व विकास होत असतो. यासाठी तरुणांनी चारित्र्यवान, परस्पर सहयोगी, सुसंस्कारित, काही करून दाखविण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींच्या सहवासात राहायला हवे. जीवनातील कोणत्याही अवस्थेत, कोणात्याही टप्प्यावर संगत-सोबत विशेष महत्त्वाची असते. संगतीद्वारेच माणसाचे जीवन प्रगतीच्या वा अधोगतीच्या दिशेने जाऊ लागते. संगती म्हणजे संगत + गती म्हणजेच साथ साथ जाणे. हे जाणे उत्तमही असू शकते व वाईटही.

आपल्या आजूबाजूचे वातावरण, आपले मित्र ज्या वृत्तीचे असतील त्यांच्या सहवासात येऊन आपले व्यक्तिमत्त्वही त्यांच्याप्रमाणेच होऊन जाते. जर आपली मैत्री, आपला संपर्क चांगल्या, सुशिक्षित, हुशार, आदर्श व्यक्तीशी असेल, तर आपले लक्षही त्याच्या सद्गुणांवरच जाईल. त्यांच्याकडून आपल्यालाही उत्तम प्रेरणा मिळेल आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल. नवनवीन जिज्ञासा जागवतील. नवे काही करून दाखवण्याची उर्मी मनात जागी होईल. याउलट जर आळशी, गर्विष्ठ, उधळ्या, व्यसनी व्यक्तीच्या सहवासात आपण राहिलो, तर आपले मनही त्यानुरूप होईल व त्यामुळे आपली प्रतिमा खराब होईल.




संगतच माणसाला चांगल्या-वाईटात फरक करायला शिकवते व त्यामुळे आपला आत्मविश्वासही वाढतो. दोन वेगवेगळ्या व्यक्तींच्या संपर्कात येऊन त्यांचे तौलनिक विश्लेषण केले, तर ज्याच्याकडून आपल्याला काही चांगले शिकायला मिळेल त्यालाच उत्तम सोबती म्हणता येईल.

त्याच्याच संगतीत आपल्या जीवनाला वळण लागू शकेल. नवी रंगत आणता येईल. बऱ्याचदा आपण अहितकर गोष्टींच्या आहारी चटकन जातो व त्या गोष्टी लवकर आत्मसात करतो. हे टाळण्यासाठी आपण कितीही विषारी सर्पांनी वेढल्यानंतरही आपला सुगंध न गमावणाऱ्या चंदनाच्या झाडाप्रमाणे व्हायला हवे.

# व्यक्तीच्या बाह्यरूपावरून तिला कोणती व्याधी होऊ शकते हे समजते

जगभरातील विविध विद्यापीठे आणि आरोग्य संस्थांमध्ये आरोग्यासंदर्भात संशोधन सुरू असते. यात केवळ औषधांवरच लक्ष केंद्रीत केलेले असते असे नव्हे तर प्रत्येक व्यक्तीच्या बाह्यरुपावरून तिला भविष्यात कोणती व्याधी होऊ शकेल किंवा होऊ शकणार नाही यावरही विचार केला जातो. ब्रिटिश जर्नल ऑफ कॅन्सर या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या एका शोध निबंधानुसार अनामिकेपेक्षा (करंगळीशेजारील बोट) तर्जनीची (अंगठ्याशेजारील बोट) लांबी अधिक असलेल्या पुरुषांमध्ये प्रोस्टेट कॅन्सर (पौरुषग्रंथींचा कर्करोग) होण्याची शक्यता कमी असते. अशा व्यक्तींमध्ये ही गंभीर व्याधी जडण्याची शक्यता केवळ एक तृतियांश असते, तसेच तरुणांमध्ये ही शक्यता त्याहूनही कमी असते असे या शोध निबंधात म्हटले आहे. इंग्लंडमधील इन्स्टिटट्यूट ऑफ कॅन्सर रिसर्चमधील प्राध्यापिका आणि या संशोधनात सहभागी झालेल्या सदस्या रॉस इलेस म्हणतात, बोटांच्या लांबीवरून प्रोस्टेट कॅन्सरची शक्यता वर्तवणे शक्य असल्याचे आमच्या संशोधनावरून सिद्ध झाले आहे. विशेषत: ६० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या पुरुषांच्या बाबतीत ही शक्यता अचूकपणे वर्तवता येते.



बोटांच्या रचनेवरून कोणत्या पुरुषांनी नियमित तपासणी करून घ्यावी किंवा या व्यधीसंदर्भातील कौटुंबिक इतिहास तपासून पहावा हे ठरवता येते. इलेस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९९४ ते २००९ या कालावधीत यावर संशोधन केले असून त्यांनी प्रोस्टेट कॅन्सरच्या इंग्लंडमधील एकूण १५०० रुग्णांची तसेच ३००० निरोगी पुरुषांची मुलाखत घेतली. रुग्णांपैकी जवळ-जवळ ५० टक्के रुग्णांच्या तर्जनीची लांबी अनामिकेपेक्षा कमी असल्याचे आढळून आले. अनामिका आणि तर्जनीची लांबी सारखी असलेल्या पुरुषांमध्येही प्रोस्टेट कॅन्सरची शक्यता तेवढीच असल्याचे आढळून आले; परंतु अनामिकेपेक्षा तर्जनीची लांबी अधिक पुरुषांमध्ये ही शक्यता ३३ टक्क्यांनी कमी झाल्याचे स्पष्ट झाले. ६० वर्षांपेक्षा कमी वयाच्या पुरुषांना ही व्याधी जडण्याची शक्यता ८७ टक्क्यांनी कमी असते. एखाद्या व्यक्तींच्या बोटांची सापेक्ष लांबी जन्मापूर्वीच ठरलेली असते. गर्भातील बाळाला कोणत्या संप्रेरकांचा अधिक पुरवठा होतो यावरून बहुधा तर्जनी आणि अनामिकेची सापेक्ष लांबी ठरत असावी. कारण काहीही असले तरी तर्जनीची लांबी कमी असलेल्या पुरुषांनी प्रोस्टेट कॅन्सरसंबंधीच्या तपासण्या नियमितपणे करणे हाच उत्तम मार्ग आहे.

# स्त्रीचे डोळे ही सौंदर्याची एक देन

व्यक्तीच्या सौंदर्याचे खरे रुप कशात लपलेले असते तर ते त्याच्या डोळ्यातच लपलेले असते. डोळे ही सौंदर्याची एक देन असून प्रत्येक व्यक्ती हे सारे जग आपल्या नयनानेच बघू शकते. यामुळे आपले नयन सुरेख,सुंदर व निरोगी रहावे याकरिता आपल्या डोळ्याची देखभाल प्रत्येक व्यक्ती करत असते. आजच्या प्रगत जगात वावरताना सौंदय वाढविण्याकरिता वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. वेगवेगळ्या प्रकारची सौंदर्यप्रसाधने आणि वेगवेगळ्या प्रकारचे रंग वापरले जातात.

सुंदर डोळ्यांसाठी गरज असते सुंदर पापण्यांची. पापण्या जशा डोळ्यांना आकर्षक बनवतात तशाच त्या डोळ्यांचे वातावरणातील प्रदूषणपासून रक्षणही करतात व डोळ्यातून ओलही राखतात. डोळ्या अश्रू ओघळण्याचे व डोळ्यांतून अश्रू निपटण्याचे कामही पापण्याच करीत असतात.



पापण्याच्या ठेवणीत अनेक कारणांमुळे दोष उत्पन्न होतात. उदा. जन्मजात दोष, पापण्यांची गर्भावस्थेत पूर्ण वाढ न होते, वाढत्या वयाचा दोष, सैल होणे, केसांसह पापण्या आत वळणे, जखम होणे, फोड, पुरळ, रांजणवाडी इ. या सर्व दोषांवर सर्जरीव्दारे उपचार करता येतात.

त्वचा सैल होणे : वाढत्या वयामुळे त्वचा सैल पडते व बेढब दिसू लागते. बऱ्याचदा पापण्या आत वळून पापण्यांचे केस बुबुळावर घासले जातात व त्यामुळे बुबळावर जखम होण्याचा धोका असतो. अशावेळी त्वचा सर्जरीव्दारे आवळता येते. सौंदर्यासाठी पापण्यांवरील रांजणवाडी वा फोड त्वरीत काढावेत व त्याची पॅथॉलॉजिलक तपासणीही करावी. कारण तो कॅन्सरही असू शकतो. रांजणवाडी वा फोड काढल्यानंतर जो दोष राहातो तो प्लॅस्टिक सर्जरीने दूर करता येतो.

# दिवाणखाना सजवताना जास्त सतर्क राहायला हवे

दिवाणखाना म्हणजेच आपली ड्राईंगरुम आपल्या घराचा दर्शनी भाग. इथेच आपल्या घरी येणारी-जाणारी पाहुणे मंडळी बसतात. गप्पा मारतात. यासाठी दिवाणखाना सजवताना जास्त सतर्क रहायला हवे.

* दिवाणखान्यातील सोफासेट खोलीच्या आकारानुसार लहान वा मोठा असावा.

बसणाऱ्याला आरामदायक वाटण्यासाठी सोफा गुबगुबीत गादीचा असावा.

* वेताच्या खुर्च्याही आरामदायक असतात. त्यावर सुंदर गाद्या ठेवून त्या आरामदायक बनवता येतात. खुर्च्या व दिवाणही गाद्या व तक्के ठेवून आरामशीर करता येतात.

ड्राॅईंगरुममध्ये उपयुक्त ठिकाणी टी पॉय ठेवू शकता. त्यावर एखादा फ्लॉवर पॉट सजवून ठेवावा.

* भिंतीवर सौम्य व भडक रंगांची एक-दोन पेंटिंग्ज लावल्यास ड्राईंगरुमच्या सौंदर्यात भर पडते. पेंटिग्ज लावण्यापूर्वी भिंतींचा आकार व फर्निचर वगैरे लक्षात घ्यावे.

* रेडिओ, टेपरेकॉर्डर, फोन इ. व्यवस्थित जागच्या जागी ठेवावे.

* भिंतीवर टांगून वा कडेला फुलांची टोपली ठेवल्यास रुमचे सौंदर्य वाढते.

* रुमच्या कोपऱ्यातील फुलझाडे वा रोपे सौम्य - सफेद दिव्यांनी सजवावीत.

* मासिके, वृत्तपत्रे इ. सामान ठेवण्यासाठी टेबल व कपाटात सोय केलेली असावी. जेणे करुन या वस्तू इकडे तिकडे पसरुन पडणार नाही.

* टेबलावर एक लॅम्पही असावा.

* कलात्मक वस्तू ठेवल्यामुळे रुमची शोभा द्विगुणीत होते.


* रुममधील भिंतीवर वा इतर योग्य ठिकाणी एक घड्याळही असावे.

* ड्रॉईंगरुम शोरुम वा गोडावून वाटेल एवढ्या वस्तू तेथे जमा करुन ठेवू नयेत. उठण्या बसण्यासाठी व वावरण्यासाठी सोयीस्कर जागा ठेवावी.

# वयाच्या साठीनंतर आहार कमी घ्यावा

वयाच्या साठीनंतर आहार कमी घ्यावा. त्यामुळे ताजेतवाने राहाता येते. असे संशोधनाद्वारे निदर्शनास आले आहे. हिरवा भाजी-पाला व फळांचा रस उपयुक्त ठरतो.

वैद्यकशास्त्रानं प्रगती केल्यामुळे मृत्युदर कमी झाला. आयुष्य वाढले, असे म्हटले जाते. कसं जगायचं, कसं जपायचं हे ज्याचं त्याला फार उत्तमरितीने कळत असतं. हे कळत नसेल तर मग मंदबुद्धीच म्हणावा लागेल. वयाच्या अठरावर्षापर्यंतचा काळ पोरकटपणातच जात असतो. कुणी अशा पोरकट वयाकडे व या वयातील व्यक्तीकडे गंभीरपणे पाहातच नसतो. नंतर १९ ते ४० हा उमेदीचा व मिळकतीचा मोठा टप्पा सुरू होतो. हा टप्पा निरनिराळ्या अनुभवांनी, जबाबदाऱ्यांनी व कर्तव्यांनी आपणास संपन्न करत असतो. याच दरम्यान आपण विवाह करतो व जीवनवृक्षाला फांद्या फुटू लागतात. आपलं जीवन आपल्यापुरतं न राहता ते विभागलं जातं. अनेक नाती बनतात. अनेक मित्र, हितसंबंधी जीवनात येतात. आपण तारुण्य ते प्रौढ असा हा टप्पा वेगाने पूर्ण करतो. त्यानंतर ४१ ते ५२ हा शिखरावरून उताराकडे हा टप्पा सुरू होतो. हा कालखंड सिंहावलोकनाचा असतो. धावते पाणी इथ स्थिरावते आयुष्य तलाव बनतो. डॉक्टरी भाषेत असं म्हणतात की, पन्नाशीनंतरच जीवन हे 'बोनस' समजावं. पैसा जसा आपण जपतो तसंच पन्नाशी नंतर स्वतःची तब्येत जपावी. तारुण्यावस्थेपासूनच माणसाला जर व्यायामाची सवय असेल तर फारसे धोके उद्भवत नाहीत. वयाची चाळिशी ओलांडली की, मानसिक व शारीरिक बदल होण्यास सुरुवात होते. आयुष्याच्या वळचणीला रक्तदाब, संधिवात, शारीरिक शक्तीची कमतरता, इंद्रिये शिथिल होणे वगैरे बाबी येऊन थांबतात. यावेळी व्यसनांपासून दूर राहा. चाळिशीनंतर प्रत्येकाने आपल्या डॉक्टरांकडून वजन, रक्तदाब यांची नियमित तपासणी करून घ्यावी. डोळे, यकृत, मूत्रपिंड यांची तपासणी करावी. कोणत्या खाद्यपदार्थांपासून वा ऋतूपासून त्रास होतो हे ध्यानी घेऊन ते पदार्थ टाळावेत व ऋतूत योग्य कपडे घालवेत. रक्तातील हिमोग्लोबिन, कोले-स्टेरॉल, साखरेचे प्रमाण तपासून घ्यावे. वृद्धावस्थेत कॅल्शियमचे शरीरातले प्रमाण कमी होते व हाडे ठिसूळ बनतात. याकरिता बोन मिनरल डेन्सीटी ही तपासणीसुद्धा आवश्यक बनते. रोजच्या चोवीस तासांपैकी २४ मिनिटे व्यायाम केला तर भरपूर असतो. ही व्यायामाची आवड तारुण्यातच लावून घेतली पाहिजे. वयाच्या साठींतर आहार कमी घ्यावा. त्यामुळे ताजेतवाने राहाता येते. असे संशोधनाद्वारे निर्दशनास आले आहे. हिरवा भाजी-पाला व फळांचा रस उपयुक्त ठरतो. अंकुरित धान्ये, ज्वारी बाजरी, फळे यांचा आहारात समावेश असावा. तेलकट, तिखट व चमचमीत खाणे टाळावे. तन आणि मन निरोगी ठेवण्यासाठी योग, साधना, प्राणायामसुद्धा उपयोगी ठरतो. आपणास जमतील तिच असाने करावीत.



हृदयरोग्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने आसने व प्राणायाम करावा. वृद्धावस्थेतस आयुष्याचा संधीकाल म्हणण्यापेक्षा 'सोनेरी संध्याकाळ' म्हणावे. हा कृतार्थ जीवनाचा टप्पा असतो. काहीजण सेवानिवृत्त झालो म्हणजे आता आपण संपलो. असे समजून हातपाय गाळतात. पु. ल. देशपांडे हे थोर साहित्यिक म्हणतात की, 'आयुष्याचा हरलेला डाव पुन्हा मांडण्यास चाळिशी उत्तम ! मागचा अनुभव जमेस असल्याने सावधपणे खेळता येते.' सदाबहार देवआनंद म्हणतात, 'माझ्या यशाची सुरुवात चाळिशीपासून झाली. मी चाळिशीत अधिक तरुण होतो व आताही तरुण आहे.

याचे रहस्य म्हणजे मी स्वतः तरुणांच्या बरोबर वावरतो. आपल्यापेक्षा कमी वयाच्या लोकांच्यात वावरल्याने आपण थकलो, दमलो, वय झालं या गोष्टी लक्षातच येत नाहीत ! सेवानिवृत्तीनंतरसुद्धा बरंच काही करता येते. आपले कडू-गोड अनुभव जगाला सांगा. गतकालाचे साक्षीदा बनून लेखन करा. पेटी-तबला शिकायला जा. लहान मुलांच्यात रमा. आपला आहार, विहार, विचार, आचार कह्यात ठेवा. आपला कोणी कंटाळा करू नये असे वागो. 'खडूस' बनू नका समवयस्कांच्या मंडळात जरूर जा; पण तिथे बसून आजच्या तरुण पिढीला नावे ठेवू नका. त्यांना समजून घ्या.

नवज्ञानाचे शिक्षणाचे, विस्तारीत कार्याचे कौतुक करा. तुमचा काळ सुखाचा होता. आजचा काळ अतिव तीव्र स्पर्धेचा आहे. आपल्या मुलाबाळांना आपल्या इतकेच जपा. आपली काठी असणारी पत्नी, तिच्या तब्येतीकडेही लक्ष द्या. 'संसार झाला, आता काही राहिलं नाही' असं म्हणू नका. नातवंडांना तुमची गरज आहे. दात पडले म्हणून गाणं सोडू नका. गुणगुणात राहा. अहो वृद्धपण हे एक बालपणच असतं. असं समजा !

■■■

# जेवताना मोबाइलचा वापर केल्यास शरीरात वाढते इन्सुलिन रेझिस्टन्सची पातळी?

जेवणादरम्यान मोबाइलचा वापर केल्याने शरीरातील इन्सुलिन रेझिस्टन्स पातळीवर परिणाम दिसून येतो. त्यामुळे ही एक चिंतेची बाब समजली जाते. तसेच यामुळे रक्तातील साखरेच्या पातळीवर परिणाम होतो असेही म्हटले जाते. पण, खरंच यामुळे शरीरावर काही परिणाम होतो का याविषयी आरोग्यतज्ज्ञांकडून जाणून घेऊ

मुंबईतील परळमधील ग्लेनिगल्स हॉस्पिटलमधील इंटरनल मेडिसिन सिनियर कन्सल्टेंट डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना नमूद केले की, जेवताना मोबाइल वापरल्याने खाण्यावरून लक्ष विचलित होते. पण, यामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स पातळी वाढते की नाही हे सांगता येत नाही. असे मानले जाते की, जेव्हा एखाद्या व्यक्तीचे जेवणादरम्यान लक्ष विचलित होते तेव्हा ती व्यक्ती अधिक खाते. यामुळे दैनंदिन गरजेपेक्षा ती व्यक्ती जास्त कॅलरीजचे सेवन करते. अशावेळी जास्त खाल्ल्याने वजन वाढू शकते, ज्यामुळे इन्सुलिन रेझिस्टन्स पातळी वाढण्याची शक्यता वाढते, असे डॉ. अग्रवाल म्हणाले.

जेवताना मोबाइलच्या वापरामुळे व्यक्ती गरजेपेक्षा अधिक खाते, यावेळी नळकत ती कमी पौष्टिक आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाची निवड करू शकते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळीही वाढू शकते. या स्पाइक्समुळे इन्सुलिन रेझिस्टन्सचे प्रमाण वाढते.



जर जेवताना व्यक्तीचे लक्ष विचलित झाले तर ती शरीरास आवश्यक आणि पुरेश्या आहाराचे सेवन करत नाही, अशाने तृप्ततेच्या सिग्नलकडे लक्ष जात नाही, ज्यामुळे संतुलित आहाराचे सेवन करणं कठीण होतं. कालांतराने इन्सुलिन रेझिस्टन्सचा धोका निर्माण होतो, असे डॉ. अग्रवाल म्हणाले.

पण, जेवताना मोबाइल वापरल्यानंतर इन्सुलिन रेझिस्टन्सची पातळी वाढते, या दाव्याची पडताळणी करण्यासाठी कोणतेही संशोधन उपलब्ध नाही. याबाबत कोणतेही पुरावे नाहीत, म्हणूनच आहाराचे योग्य प्रमाणात सेवन करणं आणि चयापचय क्रिया चांगली ठेवण्यासाठी जेवताना अत्यंत सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. योग्य प्रमाणात आहाराचे सेवन करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेवताना टीव्ही पाहणे किंवा मोबाइल फोन वापरणे टाळले पाहिजे, असे डॉ. अग्रवाल यांनी सांगितले.

जेवणादरम्यान पूर्णपणे त्यावरच लक्ष देणं. खाण्याच्या संवेदी अनुभवाकडे लक्ष देणे आणि शरीराच्या भूक आणि तृप्ततेच्या सिग्नलकडे लक्ष देणे म्हणजेच जेवताना सजग राहणे गरजेचे आहे. या पद्धतीमुळे व्यक्तीला खाण्याचा आस्वाद घेण्यास आणि काय आणि किती प्रमाणात खावे हे लक्षात येते, अशी माहिती कन्सल्टेंट डायटिशियन आणि डायबिटीज एज्युकेटर कनिका मल्होत्रा यांनी दिली.

मल्होत्रा पुन्हा म्हणाल्या की, जेवणादरम्यान मोबाइलचा वापर केल्याने इन्सुलिन रेझिस्टन्सची पातळी वाढते याबाबतचे कोणतेही थेट संशोधन नाही, पण तुमची खाण्याची गती आणि जागरुकता चयापचय आरोग्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. जलद किंवा बेफिकीरपणे खाल्ल्याने रक्तातील ग्लुकोजच्या पातळीत वाढ होऊ शकते, ज्यामुळे कालांतराने इन्सुलिन रेझिस्टन्सची पातळी वाढू शकते. हे विशेषतः टाइप २ मधुमेह किंवा मेटाबॉलिक सिंड्रोमचा धोका असलेल्यांसाठी चिंताजनक आहे.

**अशा परिस्थितीत काय करावे?**

जेवताना मोबाइल, टीव्ही अशा लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टी बाजूला ठेवा. फक्त तुमच्या जेवणावर आणि खाण्याच्या कृतीवर लक्ष केंद्रित करा.

अन्नाची चव, पोत आणि सुगंध जाणून घेण्यासाठी वेळ काढा. यामुळे आनंद वाढतो आणि तुम्ही कधी समाधानी आहात हे ओळखण्यास मदत होते.

जेवण्यापूर्वी भूकेच्या संकेतांकडे लक्ष द्या आणि पोट भरल्यासारखे वाटल्यास खाणं थांबवा. ही जाणीव जास्त खाण्यापासून रोखू शकते.

जेवण्यापूर्वी तुमच्या जेवणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी थोडा वेळ काढा. यामुळे अन्नाशी तुमचा संबंध वाढू शकतो आणि अधिक जागरूक दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो.

जर तुम्ही कुटुंबासह जेवत असाल तर अशावेळी मोबाइलऐवजी मनोरंजक संभाषणांवर लक्ष केंद्रित करा, यामुळे जेवणाचा अधिक आनंद घेऊ शकता. खाण्याचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते.

तुम्ही जेवताना मोबाइल बाजूला ठेवून खाल्ल्यास तुमची चयापचय क्रिया सुधारते, पोट योग्यरित्या भरते, अधिकचे अन्न सेवन टाळू शकता असेही मल्होत्रा म्हणाल्या.

# नोकरी स्विकारताना तेथील परिस्थितीचा अंदाज घ्या...

घडाळ्याच्या सेकंद काट्याला बांधलेलं आयुष्य जगताना स्वत:ची जबाबदारी पेलत पूर्ण कुटुंबाची जबाबदारी पेलण्याची गरज भासते. आणि यातूनच व्यवसाय शोधावा लागतो. प्रत्येक व्यवसायात रिस्क असतेच. पण काही काही ठिकाणी ती प्रमाणापेक्षा जास्त उचलावी लागते आणि यामध्ये स्वत:च्या मनाला मुरड घालून जगावे लागते. काही ऑफिसच्या ठिकाणी सारेच लोक योग्य पद्धतीने वागतील असे नाही. त्यामुळे नव्याने नोकरी किंवा व्यवसाय जॉईन करताना तेथील परिस्थितीचा अंदाज घेऊनच वागावे.

**नव्या जॉबमध्ये फर्स्ट इम्प्रेशनला खूप महत्त्व आहे** :- करिअरमध्ये नवा जॉब-नोकरी स्वीकारल्यावर त्यात यशस्वी होण्यासाठी नियोजन करावं लागतं. कंपनीत ज्यावेळी नव्या नोकरीसाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक होते त्यावेळी त्या व्यक्तीच्या वागण्या बोलण्यात, कामावर अनेकांचे लक्ष असतं. विचार कसे करते, स्वतःला ती व्यक्ती



कशी पेश करते याला महत्त्व असतं. यासाठीच नव्या नोकरीत रूळताना काही गोष्टी नेहमीच लक्षात ठेवाव्यात.

**आधी रिलॅक्स व्हा** :- जुनी नोकरी सोडून नव्या कंपनीत जॉईन होताना आधीच्या कंपनीशी असलेले संबंध चांगले-जिव्हाळ्याचे ठेवा म्हणजे नव्या नोकरीत तुम्ही सकारात्मक भावनेने काम करू शकाल. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे नव्या कंपनीत जॉईन होण्याआधी पर्सनल ब्रेक घ्या. हा वेळ पूर्णपणे स्वतःसाठी वापरा. कामाच्या धावपळीमुळे जे तुम्हाला आतापर्यंत करता येणं शक्य नव्हतं ते या ब्रेकमध्ये करता येणं शक्य नव्हतं ते या ब्रेकमध्ये करा. त्यामुळे तुम्ही पूर्णपणे तणावमुक्त व्हाल. लक्षात ठेवा ताज्या दमाने उत्साहाने सुरुवात म्हणजे यशाची खात्री !

**कामाच्या ठिकाणी पहिला दिवस** :- पहिल्या दिवशी फर्स्ट इम्प्रेशन महत्त्वाचं असतं त्यामुळे ड्रेस ऑफिसच्या वातावरणाला साजेसा ठेवा. आत्मविश्वासाने वागा. कमी बोला; पण हसतमुख राहा. टीममध्ये स्वतःची पोझिशन काय आहे हे जाणून घ्या. कामाच्या संदर्भात काय जबाबदारी आहे हे समजून घ्या म्हणजे कंपनीचं वर्क कल्चर काय आहे याची तुम्हाला जाणीव होईल.

**योग्य प्रश्न विचारा** :- तुम्हाला तुमच्या कामाबद्दल सगळंच ठाऊक आहे, अशी अपेक्षा कोणीच करणार नाही. त्यामुळे एखादी गोष्ट तुम्हाला नीटपणे समजली नसेल तर त्याविषयी प्रश्न विचारा; पण जे विचाराल त योग्य आणि अचूक असायला हवं. जर एकाच प्रश्नाबद्दल शंकेबद्दल पुन्हा विचारावंस वाटत नसेल तर आधीच नोट्स काढा. कारण तुम्ही कसे प्रश्न विचारता यावरून तुम्ही कसा विचार करता हे समोरच्या व्यक्तीच्या लक्षात येतं. एकाचवेळी अनेक प्रश्न विचारू नका; कारण त्यातून कुठल्याच प्रश्नावर विचार केलेला संभाव्य उत्तर नाही हे त्यातून लक्षात येतं.

**जबाबदारी स्वीकारा** :- चुका होतात, प्रत्येकाकडून होतात; पण सोबतच चूक झाली तर जबाबदारी स्वीकारा. तुम्ही जे करता त्यातून तुमचा दृष्टिकोन दिसून येतो त्यामुळे टीकाही खुल्या मनाने स्वीकारा. चुकांमधून काही न शिकणं हा एक प्रकारचा गुन्हाच आहे. कामाच्या ठिकाणी सहजतेने वागा, इतरांमध्ये मिसळताना स्वतःचं वेगळेपण जपा. नव्या कतल्पना खुल्या मनाने स्वीकारा; तडजोडीला तयार राहा. नव्या नोकरीत अशी काळजी घेणं आवश्यक आहे.

# शिंकताना डोळे बंद का होतात

जोरात शिंकताना तुमचे डोळे कसे असतात ? लक्षात नाही ? आठवून पाहा बरं ! बऱ्याच वेळा शिंकताना तुमचे डोळे बंद असतात. असं का ? तोंडातून उडणाऱ्या फवाऱ्यात असणारे जंतू डोळ्यांत शिरू नयेत, म्हणून हे आपोआप घडून येतं, असं काही जणांचं म्हणणं आहे. पण त्यात तथ्य नाही; कारण आपले डोळे नेहमी उघडे असताना अनेक जंतू हवेत फिरत असतात आणि त्यापासून रक्षणाची नैसर्गिक रचना डोळ्यांकडे आहे. मग शिंकताना आपण डोळे का मिटतो ? तर, तो एक प्रकारचा प्रतिसाद असतो. अवघड भाषेत सांगायचं तर प्रतिक्षिप्त क्रिया. शिंक येते थेव्हा आपण एक प्रकारे बेसावध असतो.

जवळच फटाके लावले असतील आणि आपल्याला ते माहीत नसेल, तर आपली जी अवस्था असते, तशीच शिंकताना असते. शिंक येण्याचा वेग किती असतो, माहीत आहे ? ताशी १०० मैल, म्हणजेच १५० किलोमीटर !

बेसावध असताना इतर कोणतीही आघात करणारी घटना घडली, तर आपण डोळ्यांचे स्नायू आकुंचित करतो.

अगदी बेसावध असताना जवळ फटाके वाजले, तरी प्रथम तेच करतो. ती संवेदना अंतर्मनातच तयार होते. अगदीच हेच शिंक येताना होतं आणि बऱ्याच वेळा आपण चटकन डोळे मिटून घेतो.... आपोआप!

# प्रेग्नन्सीत दिवसभर झोपून राहणं बरं नाही, बाळाच्या तब्येतीवर होऊ शकतो परिणाम!

गरोदरपणात महिलांना नीट झोप येत नाही. जर कोणी या दिवसांत गाढ झोप घेत असेल तर ती निश्चितच खूप भाग्यवान आहे. प्रत्येक गर्भवती महिलेसाठी संपूर्ण दिवसात ७ ते ८ तासांची झोप आवश्यक असते. गर्भाशयात वाढणाऱ्या बाळासाठी देखील हे आवश्यक आहे. कमी झोप घेतल्याने बाळाच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. त्याचप्रमाणे दिवसभर अंथरुणावर पडून राहणे देखील बाळाच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते.आज आपण डॉ. मानसी नारळकर यांच्या माध्यमातून समजून घेऊ या की गर्भवतीने किती वेळ आणि कसे झोपावे.

**प्रेग्नन्सीत जास्त झोप येण्याची कारणे**

गर्भधारणेदरम्यान गर्भवतीच्या चयापचय प्रक्रियेत बदल होतो. त्यामुळे ती थकलेली राहते. शिवाय गर्भधारणेदरम्यान शरीर गर्भधारणा आणि प्रजनन चक्र संतुलित करण्यासाठी प्रोजेस्टेरॉन हार्मोन स्रावित करते. हार्मोनल बदलांमुळे, गर्भवती स्त्रीला जास्त झोप येऊ शकते. प्रोजेस्टेरॉनची पातळी वाढल्यामुळे आणि रक्तातील साखर आणि रक्तदाब कमी झाल्यामुळे शरीर थकते. परिणामी, गर्भवती स्त्री बराच वेळ झोपून राहते.

डॉ. मानसी नारळकर यांनी प्रेग्नन्सीतल्या झोपेविषयी दिलेली माहिती

प्रेग्नन्सीत झोप न येण्याची कारणे

शारीरिक बदल, पोटाच्या आकारात वाढ, चिंता इत्यादींमुळे झोपेचा भंग होतो. याची कारणे अशी आहेत-गर्भधारणेदरम्यान गर्भवती स्त्रीच्या पोटावर खूप दबाव येतो, ज्यामुळे GERD होतो. पोटात तयार झालेले आम्ल अन्ननलिकेपर्यंत पोहोचल्यावर ही स्थिती उद्भवते. गरोदरपणात अनेक महिलांना गॅस्ट्रोइसोफेजियल रिफ्लक्सचा त्रास होतो. त्यामुळे महिलांना शांत झोप येत नाही. कधीकधी झोपेत असतानाही ही समस्या त्यांना खूप त्रास देऊ शकते. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशनमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीत २६.१ ते ३६.१ टक्के गर्भवती महिलांना GERD चा त्रास होतो आणि तिसऱ्या



तिमाहीत ५१.२ टक्के गर्भवती महिलांना GERD चा त्रास होतो.

**स्लीप एप्नीया म्हणजे काय**

हा एक गंभीर प्रकारचा झोपेचा विकार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला स्लीप एपनिया होतो तेव्हा तो झोपेत श्वास घेऊ शकत नाही. हे काही काळासाठी घडते.

परिणामी, तिच्या शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळत नाही. श्वास थांबल्यामुळे तिचे डोळे उघडतात. स्लीप एपनिया झालेल्या गर्भवती महिलेला बराच वेळ झोप घेऊनही ताजेतवाने वाटत नाही. गर्भवती महिला रात्री घोरत असेल आणि रात्रभर झोपूनही थकवा जाणवत असेल, तर ते स्लीप एप्नियामुळे असू शकते. अशा परिस्थितीत ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा. काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की गर्भधारणेदरम्यान हार्मोनल बदलांमुळे स्लीप एप्निया होऊ शकतो.

**रेस्टलेस लेग सिंड्रोम**

खुर्ची/सोफा/दीवाण असं कुठेही बसलेले असताना विनाकारण पाय हलवण्याच्या सवयीला रेस्टलेस लेग सिंड्रोम म्हणतात. जर गर्भवती महिलेला ही समस्या असेल तर त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ही सवय मेंदूसाठी नकारात्मक असू शकते. या काळात, महिलेला तिचे पाय हलवण्याची तीव्र इच्छा असते. झोपेच्या वेळीही ही इच्छा तीव्र राहते. तज्ञांच्या मते, हे इस्ट्रोजेनच्या वाढत्या पातळीमुळे आणि फॉलिक ॲसिड आणि लोहाच्या कमतरतेमुळे असू शकते. म्हणून, जर रात्री झोपेत व्यत्यय येत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**वारंवार लघवी होणे**

गर्भधारणेदरम्यान वारंवार लघवी होणे खूप सामान्य आहे. काही महिलांना वारंवार लघवी करण्याची तीव्र इच्छा असते. हे पहिल्या आणि तिसऱ्या तिमाहीत जास्त होते. हे स्वाभाविक आहे, ते थांबवता येत नाही. पोटाचा आकार वाढल्यामुळे, मूत्राशयात नेहमीच दाब असतो, ज्यामुळे महिलेला वारंवार लघवी करण्याची इच्छा होते.


टीप: हा लेख केवळ सामान्य माहितीच्या उद्देशाने आहे. हा वैद्यकीय सल्ला, निदान किंवा उपचारांचा पर्याय नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# हिरव्यागार गवतावर चालण्याने शरीराला होतात 'हे' ५ फायदे

सकाळची वेळ ध्यान आणि शारीरिक हालचालींसाठी सगळ्यात बेस्ट मानली जाते. त्यामुळे अनेक जण सकाळी व्यायाम करणे, सायकल चालवणे किंवा अगदी चालायला सुद्धा जातात. पण, सकाळी हिरव्यागार गवतावर चालण्यानेही तुम्हाला फायदा होऊ शकतो. ही साधी सवय, अनेक आरोग्य फायदे देते जे तुम्हाला आश्चर्यचकित करू शकतात.

**१. ताण आणि चिंता दूर करण्यात मदत**

सकाळी गवतावर चालल्याने मन शांत होते. ताजी हवा, थंड गवत नैसर्गिकरित्या कोर्टिसोलची पातळी कमी करते, जो तणाव येण्यासाठी जबाबदार असतात. फक्त १० ते १५ मिनिटे अनवाणी चालल्याने तुमचे



मन शांत होते आणि दिवसभर तुमचा मूड चांगला राहतो.

**२. झोपेची गुणवत्ता सुधारते**

अनवाणी पायांनी जमिनीला स्पर्श केल्याने तुमच्या शरीराच्या अंतर्गत घड्याळाचे नियमन होण्यास मदत होते. म्हणजेच अभ्यासातून असे दिसून आले आहे की, जमिनीवर चालल्याने मेलाटोनिनचे उत्पादन सुधारून चांगली झोप येते. मॉर्निंग वॉक तुमच्या दिवसासाठी एक निरोगी लय सेट करतो आणि रात्री चांगली झोप घेण्यास मदत करतो.

**३. रोगप्रतिकारक शक्ती वाढते**

अनवाणी चालण्यामुळे तुमचे शरीर पृथ्वीवरील इलेक्ट्रॉन शोषून घेते, जे जळजळांशी लढण्यास आणि तुमच्या रोगप्रतिकारक शक्तीला आधार देण्यास मदत करतात. पहाटेच्या सूर्यप्रकाशाबरोबर, गवतावर अनवाणी चालण्याची सवय तुमच्या शरीरात नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन डी आणि उर्जेची भर घालते.

**४. पाय आणि स्नायू मजबूत करते**

चालताना बूट घातल्याने अनेकदा नैसर्गिक हालचाल मर्यादित करतात. पण, अनवाणी चालण्यामुळे तुमच्या पाय आणि घोट्यांमधील लहान स्नायू आणि अस्थिबंधन मजबूत होतात. कालांतराने, यामुळे शरीराची स्थिती, संतुलन आणि एकूण पायांचे आरोग्य सुधारू शकते; ज्यामुळे दुखापतीचा धोका कमी होतो.

**५. रक्ताभिसरण सुधारते**

गवतसारख्या नैसर्गिक पृष्ठभागावर चालण्याची क्रिया तुमच्या पायांमधील मज्जासंस्थांना उत्तेजन दिल्याने संपूर्ण शरीरात रक्तप्रवाह सुधारतो.. सुधारित रक्ताभिसरण म्हणजे तुमच्या अवयवांना चांगले ऑक्सिजन वितरण आणि नैसर्गिक ऊर्जा देते.

## छान छान गोष्टी...

# दिव्याची चोरी, चोराला पडली भारी

गावाजवळ डोंगरावर एक सुंदर देऊळ होते. त्या देवळाच्या देखरेखीसाठी गावकऱ्यांनी एक पुजारी ठेवला होता. तो रोज रात्री देवापुढे दिवा लावून देवाचे भजन म्हणत असे आणि झोपला तरी देवळाची दारे खिडक्या उघडी ठेवत असे.

दिव्यामुळे डोंगरातील खडबडीत वाटेवर प्रकाश पडत असे.

एकदा एका चोराची नजर त्या दिव्यावर पडली. दिवा सोन्याचा होता. चोर त्याच रात्री देवळाकडे गेला.

दिव्याच्या प्रकाशामुळे त्याला सहजतेने देवळापर्यंत जाता आले. त्याने खिडकीतून डोकावले. पुजारी गाढ झोपलेला होता. चोर हळूच आता शिरला. दिवा विझवून आपल्या जवळच्या पिशवीत घातला व हळूहळू डोंगर उतरू लागला.

पण दिवा विझल्यामुळे चोहोबाजूला दाट काळोख पसरला होता. अचानक तो एका दगडाला धडकला. आपला तोल सावरता न आल्यामुळे गड-गडत डोंगराच्य पायथ्याशी जाऊन पडला. त्याच्या किंकाळीने पुजाऱ्याची झोप मोडली. देवळातील अंधार पाहून तो चकीत झाला.

तिकडे चोराच्या डोक्याला मार लागला होता. हाताचे हाडही मोडले होते. पुजारी कसाबसा त्याच्याजवळ पोहोचला. माचिस पेटवून त्याने जखमी चोराला पाहिले. चोराला आधार देऊन त्याने देवळात नेले व चटईवर झोपवले. त्याच्या डोक्याला पट्टी बांधली. हातालाही फळी बांधली.

चोराला खूपच लाज वाटली. त्याने पिशवीतून दिवा काढून पुजाऱ्याच्या हाती दिला. तो पुजाऱ्याला म्हणाला, माफ करा पुजारीबाबा, मी अत्यंत नालायक आहे. मी देवळातून दिवा चोरला.

ते ऐकून पुजारी प्रेमाने हसून म्हणाला, तू पाहिलंस की एक दिवा विझवण्याने किती भयंकर परिणाम होतो. जर तो पेटलेला असता, तर तू पडला नसतास. तुला मार लागला नसता. तू दुसऱ्यांचा प्रकाश हिरावण्याचा प्रयत्न केलास. जरा विचार कर, देवाने तुझ्या डोळ्यांचा प्रकाश हिरावून घेतला तर काय होईल.

चोर म्हणाला, 'देवा, मी तुला शरण आलो आहे. यापुढे मी चोरीसारखे दुष्कृत्य करणार नाही. चोराने त्या दिवसापासून सन्मार्ग स्वीकारला.

# जपानी शाळांमध्ये विद्यार्थिनी शॉर्ट स्कर्ट का घालतात? जाणून घ्या त्यामागील विशेष कारण

जपानमध्ये, शालेय गणवेश हा केवळ ड्रेस कोड नाही तर तो एक सांस्कृतिक प्रतीक बनला आहे. तेथील मुली प्रत्येक ऋतूत शॉर्ट स्कर्ट घालतात. चला जाणून घेऊया शॉर्ट स्कर्ट त्यांच्या फॅशनचा भाग कसा बनला.

जेव्हा तुम्ही जपानी चित्रपटांमध्ये कोणताही शाळेचे दृष्य पाहता तेव्हा तुम्हाला तिथल्या मुली शॉर्ट स्कर्ट घातलेल्या दिसतील. हे केवळ चित्रपटांमध्येच नाही तर प्रत्यक्ष जीवनातही तिथल्या मुली शॉर्ट स्कर्ट घातलेल्या दिसतात.

बाहेर तापमान शून्यापेक्षा कमी असले तरी जपानी शालेय मुली मिनी स्कर्ट घालण्याची त्यांची परंपरा बदलत नाहीत. मुली नेहमीच त्यांच्या शाळेच्या गणवेशात लहान, प्लेटेड मिनी स्कर्ट घालतात.

बऱ्याचदा लोकांना वाटते की हा फॅशन ट्रेंड अगदी अलीकडचा आहे, पण प्रत्यक्षात हा ट्रेंड कित्येक दशके जुना आहे आणि खोलवर रुजलेला आहे. चला जाणून घेऊया ही परंपरा कशी सुरू झाली आणि त्यामागील कारण काय आहे?

**फॅशनची सुरुवात**

१९९० च्या दशकात ग्यारू संस्कृतीच्या उदयाबरोबर जपानमध्ये हा ट्रेंड सुरू झाला. त्यावेळी जपानी पॉप स्टार नामी अमूरो खूप प्रसिद्ध होती.

नामी अमूरोचा फॅशन सेन्स खूपच वेगळा आणि आकर्षक होता, शॉर्ट स्कर्ट ही तिची ओळख बनली. तिची स्टाईल इतकी लोकप्रिय झाली



की त्या काळातील जपानी तरुणी, विशेषतः शाळकरी मुली, तिचे कपडे आणि स्टाईल कॉपी करू लागल्या.

हळूहळू ही फॅशन शाळेच्या पोशाखाचा एक भाग बनली. स्कर्टची लांबी लहान ठेवणे हे फॅशन स्टेटमेंट बनले तसेच आत्मविश्वास दाखवण्याचे साधन देखील बनले.

**फक्त फॅशनच नाही तर स्वतःची ओळखही**

मीडिया रिपोर्ट्सनुसार, जपानी मुली शॉर्ट स्कर्ट घालतात कारण त्यांना ते गोंडस आणि स्टायलिश वाटतात. त्यांचा असा विश्वास आहे की ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनले आहे. स्कर्टची लहान लांबी त्यांच्यासाठी केवळ एक ड्रेस नाही तर एक प्रकारची सांस्कृतिक ओळख बनली आहे.

**हिवाळ्यातही स्कर्ट का?**

येथे थंड वारे आणि बर्फवृष्टी होते, असे असूनही, विद्यार्थी त्यांच्या स्कर्टची लांबी वाढवत नाहीत. त्याऐवजी ते स्कर्टसह लोकरीचे जॅकेट, स्कार्फ आणि लेगिंग्ज घालून स्वतःला उबदार ठेवतात, परंतु स्कर्ट लहान ठेवणे त्यांच्या परंपरेचा एक भाग आहे.

**एक जागतिक सांस्कृतिक प्रतीक**

ही शॉर्ट स्कर्ट फॅशन केवळ शाळेच्या गणवेशाचीच नव्हे तर जपानी युवा संस्कृतीचे प्रतीक बनली आहे. ही शैली जपानी ॲनिमे, टीव्ही नाटके, आंतरराष्ट्रीय चित्रपट आणि अगदी के-पॉप व्हिडिओंमध्ये मोठ्या प्रमाणात दाखवली जाते, ज्यामुळे ती आणखी लोकप्रिय झाली आहे.

# ग्रीगेटर टॅक्सी सेवांसाठी नियमावली तयार करावी; टॅक्सी चालकांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार : मुख्यमंत्री

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्रात ऑनलाइन प आधारित ग्रीगेटर सहकारी टॅक्सी सेवेबाबत परिवहन विभागामार्फत तातडीने नियमावली तयार करून या सेवेस परवानगी देण्यात येईल. ग्रीगेटर सहकारी टॅक्सीमुळे लाखो चालकांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य, सामाजिक सुरक्षा निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

सहकार टॅक्सी को.ऑपरेटिव्ह लिमिटेडची (भारत टॅक्सी) सेवा सुरु करण्यासंदर्भात मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रणधीर सावरकर, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, भारत टॅक्सीचे कर्नल हिमांशू, अदानी एअरपोर्ट चे कार्यकारी संचालक जीत अदानी, मुख्य अधिकारी बी व्ही.सी. के. शर्मा, एस. टी.सी.एल. संचालक अर्चना सिंग, वाहतूक संस्थेचे रुपेश धुमाळ आणि विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ग्रीगेटर टॅक्सीमुळे चालकांच्या जीवनात परिवर्तन घडेल आणि नागरिकांना दर्जेदार सेवेचा लाभ मिळेल. या टॅक्सी सेवेच्या माध्यमातून छोट्या शहरापर्यंत सहज पोहचण्यास मदत होईल.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यात यापूर्वी ऑनलाइन प आधारित ग्रीगेटर टॅक्सी सेवा खासगी कंपन्यांकडून दिली जात आहे. सध्या या ग्रिगेटर आधारित टॅक्सी सेवांमध्ये चालकांना सामाजिक सुरक्षेच्या अभावासारख्या विविध समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच नागरिक व प्रवाशांनादेखील विविध अडचणी व समस्या येतात. या पार्श्वभूमीवर चालकांना कामगारांमधून मालकांमध्ये रूपांतरित करण्याचे आणि त्यांना सहकाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे ध्येय यामागे आहे. राज्य परिवहन महामंडळ देखील 'छावा' या नावाने प विकसित करीत आहे.

आमदार प्रवीण दरेकर यांनी यावेळी देवदत्त सहकारी वाहतूक व पर्यटन संस्थेंच्या माध्यमातून सुरू करावयाच्या सेवेबाबत माहिती दिली.

सहकार भारत टॅक्सी को. ऑपरेटिव्ह लिमिटेडचे कर्नल हिमांशू यांनी सादरीकरणाद्वारे भारत टॅक्सी सेवेबाबत माहिती दिली, ते म्हणाले. मुंबई येथे भारत टॅक्सीची सुरुवात केली जाणार असून या पाठोपाठ पुणे आणि नागपूर येथेदेखील ही सेवा पोहोचवली जाईल.

भारत टॅक्सी सेवा

देशातील सुमारे २ कोटी व्यावसायिक चालकांचे आर्थिक, सामाजिक आणि व्यावसायिक सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या निर्देशानुसार 'सहकार टॅक्सी को. ऑपरेटिव्ह लिमिटेड' (भारत टॅक्सी) ही महत्त्वाकांक्षी संकल्पना प्रत्यक्षात पुढे आली आहे.

या उपक्रमामुळे चालकांना केवळ रोजगार नव्हे, तर मालकी हक्क, सामाजिक सुरक्षा आणि न्याय्य उत्पन्नाची संधी उपलब्ध होणार आहे.

'भारत टॅक्सी' च्या माध्यमातून चालकांना कुटुंब, आरोग्य व अपघात विमा संरक्षण मिळणार आहे. तसेच प्रधानमंत्री मुद्रा कर्ज योजनेअंतर्गत कमी व्याजदराने (सुमारे ९.५ टक्के) कर्ज उपलब्ध होणार आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (पीएमजेएवाय, आयुष्मान भारत योजनेचा लाभही चालक व त्यांच्या कुटुंबियांना मिळणार आहे.

## आदिवासी पारधी जमातीचे प्रलंबित प्रश्न सोडवणार : मंत्री डॉ. अशोक वुईके

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : आदिवासी पारधी जमातीचे विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राबविण्यात येतील, अशी ग्वाही आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिली.

आदिवासी पारधी महासंघाच्या प्रतिनिधींशी मंत्रालयात झालेल्या बैठकीत डॉ. वुईके बोलत होते. यावेळी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दूरदृश्य प्रणालीद्वारे टीआरटीआयच्या आयुक्त मंजिरी मनोलकर, संबंधित वरिष्ठ अधिकारी तसेच समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले की, पारधी जमात ही समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांपैकी एक असून, या समाजाला शिक्षण, निवारा, जमीन, रोजगार, जातीचे प्रमाणपत्र आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेऊन टप्प्याटप्प्याने कार्यवाही केली जाईल. पारधी समाजातील कुटुंबांना शेतीसाठी जमीन उपलब्ध करून देणे, घरकुल योजनांचा लाभ मिळवून देणे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे, शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश सुलभ करणे आणि विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मंत्री डॉ. वुईके म्हणाले, पारधी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी विशेष पॅकेज राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यासाठी स्वतंत्र निधी राखीव ठेवण्यात आला आहे. पारधी समाजावरील खोटे गुन्हे, जातीचे प्रमाणपत्र, वनहक्क, पुनर्वसन, घरकुल आणि इतर विविध प्रश्न. या सर्व विषयांवर संबंधित विभागांशी समन्वय साधून पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिले.

## कामगारांच्या धोरणात्मक व कायदेशीर मागण्यांवर शासन सकारात्मक : कामगार मंत्री आकाश फुंडकर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील विविध कामगार घटकांच्या मागण्या आणि प्रश्नांचा सर्वंकष अभ्यास करून, आवश्यक ती पडताळणी पूर्ण झाल्यानंतर शासन स्तरावर योग्य तो धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असे कामगार मंत्री ड आकाश फुंडकर यांनी सांगितले.

कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सिटू) संघटनेच्या प्रतिनिधींसमावेत मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीस उपसचिव स्वप्नील कापडणीस, उपसचिव रोशनी कदम, संघटनेचे प्रतिनिधी



आबासाहेब चौगुले, धर्मा कांबळे, अशोक थोरात, किरण मोघे आदी उपस्थित होते. या बैठकीत कंत्राटी, बांधकाम, घरकामगार, अंगणवाडी व आशा कर्मचाऱ्यांसह विविध घटकांच्या प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कामगार मंत्री म्हणाले, विविध उद्योग क्षेत्रांतील असंघटित कामगारांच्या प्रश्नांचे पुनरावलोकन करण्यात यावे. किमान वेतन सल्लागार मंडळाची स्थापना करून कंत्राटी कामगारांचे प्रश्न निकाली काढण्यात येतील. समान वेतन कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसह विविध उद्योगांसाठी किमान वेतन निश्चिती, सफाई तसेच घरकामगारांसाठी स्वतंत्र धोरण ठरविण्यात येईल. यावेळी अंगणवाडी व आशा कर्मचाऱ्यांना विविध सामाजिक सुरक्षा लाभ उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली.

कामगार मंत्री ड. फुंडकर यांनी शासन कामगार कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत बांधकाम कामगार नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सध्या ४१ पथके कार्यरत असून तपासणी सुरू आहे.

## प्रा. राम शिंदे यांनी घेतला मनोरा आमदार निवास बांधकामाचा आढावा; १० जानेवारी, २०२८ पर्यंत सुसज्ज वास्तू पूर्ण व्हायलाच हवी

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राजधानी मुंबईतील आमदारांच्या हक्काच्या निवासाचा प्रश्न दृष्टीपथात येत असून, आज महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कंत्राटदार कंपनीच्या अभियंत्यांची उच्चस्तरीय आढावा बैठक घेऊन 'मनोरा' आमदार निवास पुनर्बांधणी प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत १० जानेवारी २०२८ पर्यंत पूर्ण झालाच पाहिजे, असे निर्देश दिले.

मुंबईच्या वास्तुवैभवात भर घालणाऱ्या मनोरा आमदार निवासच्या दोन भव्य इमारतींचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. आजच्या बैठकीत आतापर्यंत पूर्ण झालेल्या आणि बाकी असलेल्या कामाचा अहवाल सभापतींना सादर करण्यात आला. या अगोदर अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत २४ मार्च, २०२६ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात महत्वपूर्ण बैठक होऊन प्रकल्पाच्या वाढीव खर्चासह बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५५ कोटी ५० लाख रुपयांच्या विकास शुल्कास (डेव्हलपमेंट सेस) मंजुरी देण्यात आली होती.



मनोरा आमदार निवासची नवीन इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त असेल. यामध्ये प्रत्येक आमदारासाठी सुमारे १००० चौरस फूट क्षेत्रफळाचे स्वतंत्र व सुसज्ज निवासस्थान देण्यात येणार आहे. तसेच इमारतीमध्ये मिनी थिएटर, अत्याधुनिक जिम, सुसज्ज उपहारगृहे आणि उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध असतील.

आज विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीस विधानमंडळ सचिवालयाचे सचिव श्री. जितेंद्र भोळे, सौ. मेघना तळेकर इटकेलवार, श्री. शिवदर्शन साठ्ये, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता श्रीमती प्रज्ञा वाळके, कार्यकारी अभियंता श्री. विद्याधर पाटसकर, अधीक्षक आमदार निवास श्रीमती रेशमा चव्हाण यांच्यासह कंत्राटदार कंपनीचे अभियंता उपस्थित होते. यावेळी आतापर्यंत झालेल्या कामाचे सादरीकरण करण्यात आले. सर्व काम विहित वेळेत पूर्ण करा, असे निर्देश यावेळी सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले असल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी नीलेश मदाने यांनी दिली.

## कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट : पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून राज्यातील पशुपालन व्यवसायाला भरभराटी आणावी, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे केले.

'कारगिल' कंपनीने 'सिजेंटा फाउंडेशन इंडिया' आणि 'डिजिटल ग्रीन इंडिया' यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात 'एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रम' सुरू केला आहे. मंत्रालयात आयोजित या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात श्रीमती मुंडे बोलत होत्या. विभागाचे सचिव एन. रामास्वामी, कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल निमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक



रविंदर बलाईन, डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिनजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे आदी उपस्थित होते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातून पशुपालक शेतकरी आणि इतर संबंधित व्यक्ती ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रमास उपस्थित होत.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, शासनाचा नेहमीच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यावर आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर राहिला आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय हा आपल्या ग्रामीण जीवनमानाचा मुख्य कणा आहे. कारगिल, सिजेंटा फाउंडेशन आणि डिजिटल ग्रीन यांचा हा संयुक्त उपक्रम आपल्या 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनेला गती देणारा ठरेल.

तंत्रज्ञान, 'फार्मरचॅट' सारखे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल मार्गदर्शन आणि थेट दारात पोहोचणारी 'पशु आरोग्य मित्र' फिरती पशुवैद्यकीय सेवा यांच्या माध्यमातून अहिल्यानगरमधील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. 'पशु सखी'च्या माध्यमातून महिलांचा वाढणारा सहभाग ग्रामीण महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देईल. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वासही श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

अहिल्यानगरमधील राहुरी, राहता आणि श्रीरामपूर तालुक्यातील २६ गावांमधील ३ हजारहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत 'पशु आरोग्य मित्र' (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा पोहोचवली जात आहे. याशिवाय, १२० गावांधील ५ हजार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सल्ला सेवा आणि क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत दोन फिरते पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या वाहनांमध्ये आधुनिक निदान साधने, औषधे आणि लसींसाठी कोल्ड-चेन सुविधा उपलब्ध असेल. यामुळे थेट शेतकऱ्यांच्या दारात वेळेवर उपचार मिळून जनावरांचा मृत्यूदर कमी होण्यास मदत होणार आहे.

## चंद्रपूर, वणीतील तांत्रिक कारणांमुळे नाकारलेल्या प्रधानमंत्री पीकविमा प्रकरणांची फेर तपासणी करावी : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : चंद्रपूर जिल्हा आणि यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तांत्रिक कारणांमुळे नाकारण्यात आलेल्या नुकसान भरपाई प्रकरणांची फेर तपासणी करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा, अशा सूचना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील तसेच यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पीकविमा प्रकरणांबाबत मंत्रालयात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस आमदार सुधीर मुनगंटीवार, कृषी सचिव परिमल सिंह, उपसचिव प्रतिभा पाटील तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कृषी मंत्री भरणे म्हणाले की, राज्य शासनाने शेती आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले असून प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या लाभापासून कोणताही पात्र शेतकरी वंचित राहू नये. प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तांत्रिक कारणांमुळे लाभांपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. पात्र लाभार्थ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून त्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत.

यानंतर झालेल्या बैठकीत गडचिरोली येथील झाडीपट्टी शेतकरी उत्पादक कंपनी, जालना



जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील लालवाडी येथील ग्रीन म्बीशन शेतकरी उत्पादक कंपनी आणि शिवसुदर्शन शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या विविध समस्या व प्रलंबित बाबींचा आढावा घेण्यात आला. या शेतकरी कंपन्यांच्या अडचणी आणि समस्यांवर सकारात्मक मार्ग काढून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही कृषीमंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## कला विश्व

### ७,७९० कोटींची मालकीण, बॉलीवूडमधील सर्वात श्रीमंत अभिनेत्रीने का लपवलेली लग्नाची बातमी?

आज आपण अशा एका अभिनेत्रीबद्दल बोलणार आहोत, जिने ८० च्या दशकात आपल्या अभिनयाच्या प्रवासाला सुरुवात केली आणि ९० च्या दशकापर्यंत ती बॉलीवूडमधील एक आघाडीची अभिनेत्री झाली. तिचे सौंदर्य, उत्तम अभिनयावर लाखो चाहते फिदा होते. पण या अभिनेत्रीने आपल्या करिअरमध्ये शिखरावर असताना लग्न करून कोट्यवधी चाहत्यांना धक्का दिला होता. ही अभिनेत्री कोण? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तर ही बॉलीवूडमधील सध्याच्या घडीची सर्वात श्रीमंत अभिनेत्री आहे. तिचं नाव जुही चावला आहे. विशेष म्हणजे, जुहीने



आपल्या लग्नाची गोष्ट बऱ्याच काळापर्यंत सर्वांपासून लपवून ठेवली होती. चला जाणून घेऊया की, भारतातील या सर्वात श्रीमंत अभिनेत्रीने असं का केलं होतं? जुही चावलाने १९८६ मध्ये आलेल्या 'सल्तनत' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्यानंतर १९८८ मध्ये आलेल्या 'कयामत से कयामत तक' या चित्रपटामुळे ती रातोरात स्टार बनली. ९० च्या दशकापर्यंत तिची गणना बॉलीवूडमधील आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये होऊ लागली होती. त्या काळातील जवळपास प्रत्येक मोठ्या सुपरस्टारबरोबर काम केलेल्या जुहीने, बॉलीवूडमधील देखण्या अभिनेत्यांना सोडून १९९५ मध्ये उद्योगपती जय मेहता यांच्याशी लग्न केलं. जय मेहता तिच्यापेक्षा ७ वर्षांनी मोठे आहेत. जुहीने यशाच्या शिखरावर असताना लग्न केलं होतं. त्यामुळे लग्नाबद्दल सर्वांना समजलं तर आपल्या करिअरवर त्याचा वाईट परिणाम होऊ शकतो, अशी भीती जुहीला वाटत होती. लग्न झाल्यामुळे आपल्याला चित्रपट मिळण्यात अडचणी येतील आणि करिअर संपून जाईल, अशी भीती तिला होती. २०२० मध्ये राजीव मसंद यांना दिलेल्या एका मुलाखतीत ती म्हणाली होती, त्या काळात मी इंडस्ट्रीत नुकतीच स्वतःची ओळख निर्माण केली होती आणि खूप चांगलं काम करत होतं. नेमके तेव्हाच जय माझ्या आयुष्यात आले. मला भीती होती की माझं करिअर संपेल. मला माझं कामही सुरू ठेवायचं होतं, त्यामुळे लग्नाची गोष्ट लपवून ठेवणं हा मला मधला मार्ग वाटला. जूही चावला बऱ्याच काळापासून अभिनयापासून दूर आहे, तरीही ती भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेत्री आहे. 'हुरुन रिच लिस्ट'च्या अहवालानुसार, तिची एकूण संपत्ती तब्बल ७,७९० कोटी रुपये आहे. आयपीएलमधील 'कोलकाता नाईट रायडर्स' (घघठ) या टीमची ती सहमालक आहे, ज्यातून तिची मोठी कमाई होते.

### रेखा यांच्याबरोबर रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चांवर अमिताभ बच्चन स्पष्टच म्हणालेले

अमिताभ बच्चन यांनी १९६९ ला प्रदर्शित झालेल्या सात हिंदूस्तानी या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. १९७३ ला प्रदर्शित झालेल्या जंजीर चित्रपटातून त्यांना मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. अमिताभ बच्चन आजही विविध भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येतात. ते सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. बिग बी त्यांच्या ब्लॉगमध्ये त्यांचे अनुभव सांगतात. विविध चित्रपटांच्या सेटवरील ते किस्से सांगतात. अनेकदा त्यांची जुनी वक्तव्येदेखील चर्चेत असतात. अमिताभ बच्चन व रेखा हे रिलेशनशिपमध्ये होते, अशा चर्चा आजही होताना दिसतात. त्यांनी अनेक सिनेमांत एकत्र काम केले आहे. सिनेमांतील त्यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना चांगलीच आवडली होती. त्यानंतर ते रिलेशनमध्ये असल्याचे म्हटले जात होते. यावर एकदा अमिताभ बच्चन यांनी वक्तव्य केले होते. अमिताभ बच्चन यांनी सिमी गरेवालला दिलेल्या एका मुलाखतीत रेखा यांच्याबरोबर कसे नाते आहे, यावर वक्तव्य केले होते. ते म्हणालेले, ती माझी सह कलाकार होती आणि माझी सहकारी होती. सहाजिकच जेव्हा आम्ही एकत्र काम करत होतो, तेव्हा आम्हाला एकमेकांना भेटावे लागे, आमची भेट होत असे. इतर पुरस्कार सोहळे आणि कार्यक्रमादरम्यानही आमची भेट होत असे, पण ते तेवढ्यापुरतेच मर्यादित होते, असे म्हणत अमिताभ बच्चन यांनी रेखा यांच्याबरोबर ते रिलेशनशिपमध्ये नव्हते, ते त्यांच्या प्रेमात नव्हते, असे स्पष्ट केले होते. अमिताभ बच्चन यांनी वारंवार रेखा यांच्याबरोबरच्या रिलेशनशिपच्या अफवा फेटाळून



लावल्या असल्या तरी आजही त्यांच्या नात्याबद्दल वेळोवेळी चर्चा होताना दिसते. असेही म्हटले जाते की, सिलसिला या सिनेमात रेखा, अमिताभ बच्चन व जया बच्चन यांच्या खऱ्या आयुष्याचे पडसाद पाहायला मिळतात. या सिनेमात हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत होते. या तीन लोकप्रिय कलाकारांनी एकत्र काम केलेला हा तिसरा सिनेमा होता. १९८१ ला सिलसिला हा सिनेमा प्रदर्शित झाला होता. जया व अमिताभ बच्चन यांनी ३ जून १९७३ ला लग्नगाठ बांधली. त्यांना श्वेता व अभिषेक ही दोन मुले आहेत. अभिषेक हा आई-वडिलांप्रमाणे अभिनय क्षेत्रात काम करत आहे. अलीकडे अभिषेकच्या अनेक सिनेमांचे, त्यांच्या भूमिकांचे कौतुक झाले आहे. नुकताच तो राजा शिवाजी सिनेमात महत्त्वाची भूमिका साकारताना दिसला. ही भूमिका पाहिल्यानंतर अनेकांनी त्याचे कौतुक केले होते. आता तो लवकरच शाहरुख खानबरोबर किंग सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमातील त्याचा लूक व्हायरल झाला होता. दरम्यान, अमिताभ बच्चन यांच्या कामाबद्दल बोलायचे तर ते लवकरच कल्की २ या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.

✼ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे ✼ संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे ✼ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com